सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ८७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २५ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पाकिस्तानी नागरिकांना शोधा अन् तात्काळ परत पाठवा अमित शाह यांचे सर्व राज्याच्या मुख्यमंत्र्यांना निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ नवी दिल्ली**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्लूयात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर संपूर्ण देशभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानवर अनेक निर्बंध लादले आहेत. सध्या पाकिस्तान आणि भारतामध्ये तणावाचं वातावरण निर्माण झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. तसेच भारतीय जवानांकडून दहशतवाद



विरोधी मोहिम राबवण्यात येत आहे.

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्रालयाने आता एक मोठा निर्णय घेतला आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी आज (२५ एप्रिल) सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांबरोबर संवाद साधत पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्लूयाच्या पार्श्वभूमीवर चर्चा केली. तसेच यावेळी गृहमंत्री अमित शाह यांनी सर्व राज्याच्या मुख्यमंत्र्यांना महत्वाचे निर्देश दिले आहेत. 'पाकिस्तानी नागरिकांना शोधा आणि तात्काळ परत पाठवा', अशा सूचना अमित शाह यांनी सर्व राज्याच्या मुख्यमंत्र्यांना दिल्या आहेत.


भारताने पाकिस्तानी नागरिकांसाठी असलेले सर्व व्हिसा सेवा तात्काळ बंद करण्याचा निर्णय घेतला २४ एप्रिल रोजी घेतला होता. त्यानंतर आता केंद्रीय गृहमंत्रालयाने मोठा निर्णय घेत पाकिस्तानशी संबंधित सर्व व्हिसा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील आदेश गृहमंत्रालयाकडून जारी करण्यात आल्याचं वृत्तात म्हटलं आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेतला आहे.

## 'ही धर्म आणि अधर्माची लढाई', पहलगाम हल्ल्यावर मोहन भागवत यांचे मोठे विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ मुंबई**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्लूयाचा निषेध केला. ही लढाई पंथ किंवा धर्माची नसून धर्म आणि अधर्मामधली आहे, अशी प्रतिक्रिया मोहन भागवत यांनी दिली आहे. पंडित दीनानाथ मंगेशकर यांच्या ८३व्या स्मृतिदिन सोहळ्याच्या निमित्ताने विलेपार्ले येथे पुरस्कार सोहळ्यात बोलत असताना त्यांनी दहशतवादी हल्लूयाच्या निमित्ताने त्यांनी आपली भूमिका मांडली.

आपल्या भाषणात मोहन भागवत पुढे म्हणाले की, सध्या जी लढाई सुरू आहे. ती धर्म किंवा पंथामधील लढाई नाही. तर ती धर्म आणि अधर्म



यांच्यातील लढाई आहे. आमचे सैनिक किंवा इतर लोक हे कुणालाही त्यांचा धर्म विचारून मारणार नाहीत. हिंदू असे कधीही करणार नाही.दहशतवादी हल्ला झाल्यानंतर संपूर्ण देशभरात संतापाची लाट उसळली. त्यात कुणीही जात-धर्म-पंथ पाहिला नाही. हे जर नेहमी झाले तर आपल्याकडे वाकडा डोळा करून पाहण्याची कुणाची हिंमत होणार नाही आणि जर कुणी पाहिलेच तर डोळा फुटेल, असे मोहन भागवत म्हणाले.

मोहन भागवत पुढे म्हणाले, आपण असे लोक आहोत, जे प्रत्येकामध्ये चांगले पाहतो आणि ते स्वीकारतो. आज आपल्याकडे लष्कर आहे. पण एक काळ असा होता, जेव्हा आपल्याला सैन्याची गरज वाटली नाही. युद्ध होणार नाही म्हणून आपण निश्चिंत राहिलो आणि मग १९६२ साली आपल्याला धडा मिळाला. तेव्हापासून आपण आपल्या लष्कराची ताकद वाढवत आलो आहोत. दृष्टांचा नाश झालाच पाहिजे. आज याबद्दल देशात संताप तर आहेच पण मोठ्या अपेक्षाही आहेत. या अपेक्षा पूर्ण होतील, अशी आशा करूयात.

## आयएसआयची साथ, ५ दहशतवाद्यांना घेऊन सैफुल्लाहने रचला कट

### पहलगाम हल्ल्यात पाकचा बुरखा फाटला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ नवी दिल्ली**

पहलगाम हल्लूयानंतर भारतीय लष्कराचे जवान एक्शन मोडमध्ये आले आहेत. त्यातच एक सीक्रेट रिपोर्ट समोर आली आहे. पहलगाम हल्लूयाचं प्लॅनिंग लश्कर ए तोयबाचा उपप्रमुख सैफुल्लाह कसूरीने केले होते. या हल्लूयाबाबत फेब्रुवारीत बैठक झाली होती. सैफुल्लाहने ५ दहशतवाद्यांना या हल्लूयासाठी तयार केले होते. त्यानंतर मार्चमध्ये हे दहशतवादी भेटले होते. त्यामुळे जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्लूयाचे पाकिस्तान कनेक्शन जगासमोर उघड झाले आहे.

पहलगाम हल्लूयाचं प्लॅनिंग फेब्रुवारीपासून सुरू झाले होते. लश्कर ए तोयबाचा सैफुल्लाहच्या आदेशावर हा संपूर्ण कट रचला गेला. दहशतवाद्यांची पहिली बैठक फेब्रुवारीत झाली होती. त्यानंतर मार्चमध्ये मीरपूर इथं दहशतवाद्यांची दुसरी बैठक



झाली. त्यात सर्व दहशतवादी सहभागी होते. या बैठकीत पहलगाम हल्लूयाचा आराखडा बनला. पाकिस्तानी सैन्यानेही दहशतवाद्यांची मदत केली. सैफुल्लाहने पाच दहशतवाद्यांना सूचना दिल्या. त्यानंतर मीरपूर येथे पहलगाम हल्लूयाचं षडयंत्र शिजले. सैफुल्लाहसोबत बैठकीत अबू मूसा, इदरीस शाहीन, मोहम्मद नवाज, अब्दुल रफा रसूल आणि अब्दुल्लाह खालिद सहभागी होते. सैफुल्लाहला आयएसआयकडून ऑर्डर मिळत होत्या. एबीपी न्यूजनं सूत्रांच्या हवाल्याने ही बातमी दिली आहे.

लश्कर ए तोयबाचा सैफुल्लाह पाकिस्तानी सैन्याच्या कॅम्पमध्ये पोहचला होता. बहावलपूर येथील हेडक्वार्टरमध्ये पाकिस्तानी सैन्याच्या कर्नलने सैफुल्लाहचं स्वागत केले. त्याचे फोटोही समोर आलेत. पाकव्याप्त काश्मीरात एक कार्यक्रम झाला होता. १८ एप्रिलला रावलकोटमध्येही कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याचे व्हिडिओ समोर आलेत. सैफुल्लाहसोबत ५ दहशतवादी दिसत आहेत ज्यांनी चिथावणी देणारी भाषणे केली.

## पहलगामनंतर मोठी कारवाई; दहशतवादी आसिफ अन् आदिलचं घर जमीनदोस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५जम्मू काश्मीर**

पहलगाममध्ये भ्याड हल्ला करून २६ पर्यटकांचा जीव घेणाऱ्या दहशतवाद्यांना जमिनीत गाडण्याची वेळ आली आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. त्यानंतर आता या हल्लूयामध्ये सहभागी असलेल्या दोन दहशतवाद्याचे घर जमीनदोस्त करण्यात आल्याचे समोर आले आहे. वृत्तानुसार महोम्मतराल येथील आसिफ शेख याचे घर पाडण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

पहलगाम दहशतवादी हल्लूयानंतर सुरक्षा दलांनी केलेली मोठी कारवाई समोर आली आहे. पहलगाम दहशतवादी हल्लूयात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले होते. यानंतर सुरक्षा




यंत्रणांनी मोठी मोहीम सुरू केली आहे. जम्मू-काश्मीर पोलिस त्रालमधील दहशतवादी आसिफच्या घरी पोहोचले होते. त्यावेळी त्याच्या घरात स्फोटकांचा साठा होता, ज्यामुळे हा स्फोट झाल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय जम्मू-काश्मीर पोलिसांनी बुलडोझर वापरून दहशतवादी आदिलच्या घरावर कारवाई केली ते घर जमीनदोस्त केले आहे. पहलगाम हल्लूयानंतर दहशतवाद्यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता ज्यामध्ये दहशवादी सुरक्षा दलांना आव्हान देताना दिसत होते.पहलगाम दहशतवादी हल्लूयानंतर सुरक्षा दलांनी केलेली मोठी कारवाई समोर आली आहे. पहलगाम दहशतवादी हल्लूयात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले होते. यानंतर सुरक्षा यंत्रणांनी मोठी मोहीम सुरू केली आहे. जम्मू-काश्मीर पोलिस त्रालमधील दहशतवादी आसिफच्या घरी पोहोचले होते. त्यावेळी त्याच्या घरात स्फोटकांचा साठा होता, ज्यामुळे हा स्फोट झाल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय जम्मू-काश्मीर पोलिसांनी बुलडोझर वापरून दहशतवादी आदिलच्या घरावर कारवाई केली ते घर जमीनदोस्त केले आहे. पहलगाम हल्लूयानंतर दहशतवाद्यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता ज्यामध्ये दहशवादी सुरक्षा दलांना आव्हान देताना दिसत होते.

आसिफ शेख आणि आदिल हे दोघेही पहलगाम दहशतवादी हल्लूयातील आरोपी आहेत. दोन्ही दहशतवादी लष्कर-ए-तैयबाशी संबंधित आहेत. २२ एप्रिल रोजी बैसरन व्हॅलीमध्ये झालेल्या दहशतवादी हल्लूयाशी संबंधित व्हिडिओमध्ये हे दोघेही दिसत होते. या भयानक हल्लूयानंतर दोघेही फरार आहेत. हल्लूयात सहभागी असलेल्या आसिफ आणि आदिलसह इतर दहशतवाद्यांना ठार मारण्यासाठी सुरक्षा दलांचे ऑपरेशन सुरू आहे.

## सुप्रीम कोर्टाने सावरकर प्रकरणात राहुल गांधींना फटकारले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नवी दिल्ली**

स्वांत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्याबद्दल सर्वोच्च न्यायालयानं राहुल गांधींना चांगलेच फटकारले. स्वातंत्र्य सैनिकांच्या विरोधातल्या वक्तव्यांना परवानगी दिली जाणार नाही. यंदा सावरकरांबद्दल आहे, पुढच्या वेळी कुणीतरी महात्मा गांधी यांना इंग्रजांचे नोकर म्हणेल. तुम्ही पुढच्या वेळी



देखील या पद्धतीनं शेरेबाजी केली तरी कोर्ट त्याची स्वतःहून दखल घेईल, या शब्दात राहुल गांधींना सुनावलं.

सर्वोच्च न्यायालयानं राहुल गांधींना सुनावलं की, महाराष्ट्रात सावरकर पूजनीय आहेत. तुम्ही आपल्या स्वातंत्र्य सैनिकांबद्दल असं बोलू शकत नाही. तुम्ही नीट वागा, अन्यथा अडचणीत याल. तुम्ही या प्रकारचं वक्तव्य का केलं? असा सवालही कोर्टानं राहुल यांना केला आहे. त्याचबरोबर राहुल गांधी यांच्या विरोधात खालच्या कोर्टात सुरु असलेल्या खटल्यांना सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती दिली आहे.

न्यायमूर्ती दत्ता यांनी राहुल गांधींचे वकील अभिषेक सिंघवी यांना विचारले की, 'तुमच्या अशिलाला माहीत आहे का की त्यांच्या आजी इंदिरा गांधी यांनीही सावरकरांचे कौतुक करणारे पत्र पाठवले होते. त्यांना इतिहास माहीत असता तर त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांना अशी वागणूक दिली नसती.'

## ते पुन्हा एकत्र येण्याची सध्या कुठलीही परिस्थिती नाही

### मुख्यमंत्री फडणवीसांचं पवार, ठाकरे बंधूंबद्दल राजकीय भाष्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ मुंबई**

राज ठाकरेंनी साद दिल्यानंतर उद्धव ठाकरेंनी प्रतिसाद दिला. शरद पवार आणि अजित पवार बैठकीच्या निमित्ताने भेटताना दिसले आणि राज्यात पुन्हा चर्चांना उधाण आले. ठाकरे बंधू एकत्र येणार अशी चर्चा सुरू झाली. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंच्या विधानांचे वेगवेगळे अर्थ लावले जात आहेत. याच सगळ्या राजकीय परिस्थितीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'एनडीटीव्ही मराठी'च्या कार्यक्रमात मुलाखत झाली. यावेळी त्यांना ठाकरे बंधू आणि पवार काका-पुतण्या यांच्या पुन्हा एकत्र येण्याच्या शक्यतांबद्दल प्रश्न विचारण्यात आला.

राज्यात पुन्हा काही राजकीय आघाड्या होताना तुम्हाला दिसत आहेत का? कारण दोन-तीन दिवसांपूर्वी आपण बघितलं की, राज ठाकरेंना उद्धव ठाकरेंनी प्रतिसाद दिला. पुण्यात शरद पवार-अजित पवार भेटले. हे राजकीय आघाडी होतंय तुम्हाला दिसत आहे का? असा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला.



**'...तर आम्हाला त्याची अडचण नाही'**

प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, माझी पहिली भूमिका कुठलेही परिवार एक होत असतील, तर आम्हाला त्याची अडचण नाही. त्यांनी जरूर एकत्रित यावं. आम्ही त्यांच्या एकत्रित येण्याचं स्वागत करू.

**एकत्र येण्याची कुठलीही परिस्थिती दिसत नाही**

दुसरं, माध्यमे फार जास्त ऐकतात. फार जास्त विचार करतात आणि फार जास्त संदर्भ काढतात. दोन वाक्यांमधील अर्थ काढणं, हे जेवढं तुम्ही करता. मला असं वाटतं की, फार पुढचा विचार तो असतो. आतातरी मी स्पष्टपणे सांगतो. काय जे चाललेलं असेल... आतातरी अशा प्रकारच्या रिअलाईमेंटची मला कुठलीही परिस्थिती दिसत नाही. अर्थात साद आणि प्रतिसाद ज्यांनी दिला, असं तुम्ही म्हणत आहात. ते याबद्दल अधिक सांगू शकतील. मी त्याबद्दल अधिक सांगणं योग्य नाही. त्यामुळे हा मुद्दा तुम्ही त्यांनाच विचारा, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.तुम्ही एक लक्षात ठेवा, जे तुम्ही करता (अर्थ काढता) ते कधीच होत नाही.

## सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना दिल्लीत अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नवी दिल्ली**

सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना दिल्लीत अटक, २४ वर्षं जुन्या प्रकरणात कारवाई



दिल्लीचे विद्यमान नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांचा अवमान केल्याप्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना अटक करण्यात आली आहे. दिल्लीतील न्यायालयाने मेधा पाटकर यांच्याविरोधात बुधवारी अजामीनपात्र वॉरंट जारी केलं होतं. त्यानुसार आज त्यांना दिल्लीतून अटक करण्यात आली असून साकेत न्यायालयात हजर केलं जाणार आहे.

सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर त्यांच्या नर्मदा बचाओ आंदोलनासाठी ओळखल्या जातात. २००० साली त्यांच्याविरोधात दिल्लीत मानहानीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. यासंदर्भात काही दिवसांपूर्वी दिल्ली न्यायालयात सुनावणी झाली असता त्यावर न्यायालयाने मेधा पाटकर यांच्याविरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी केलं होतं. यानुसार आज दिल्ली पोलिसांनी मेधा पाटकर यांना अटक केली आहे.

## संपादकीय ......

# पाकपुरस्कृत दहशतवादाचे बदलते तंत्र

पहलगाममधील भीषण दहशतवादी हल्ल्यातून पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादाचे बदलते तंत्र समोर आले आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये 'टार्गेट किलिंग'चा प्रवाह काश्मीरमध्ये दिसून येतच होता; पण धर्म विचारून हत्या करण्यातून दहशतवाद्यांना सर्वसामान्यांच्या मनामध्ये भीती निर्माण करायची आहे. पाकपुरस्कृत दहशतवादी संघटना या धार्मिक आधारावर दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. अमरनाथ यात्रेच्या पार्श्वभूमीवर झालेल्या ताज्या हल्ल्याच्या माध्यमातून इतर धर्मीयांनी जम्मू-काश्मीरमध्ये येऊ नये, असा इशारा दहशतवाद्यांना द्यावयाचा आहे.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममधील बैरासन व्हॅलीमध्ये झालेला दहशतवादी हल्ला हा भीषण, नृशंस आणि तितकाच भेदक आहे. २०१९ च्या पुलवामा हल्ल्यानंतरचा हा सर्वांत मोठा दहशतवादी हल्ला आहे. पुलवामामधील हल्ला हा लष्करी जवानांवर झाला होता; पण पहलगाममधील हल्ल्यामध्ये सर्वसामान्य नागरिकांना आणि विशेषतः पर्यटकांना लक्ष्य करण्यात आले. हा बदल महत्त्वाचा असून त्यातील गर्भितार्थ लक्षात घेणे आवश्यक आहे. पहलगाममध्ये यापूर्वीही दहशतवादी हल्ले झालेले आहेत. साधारण अडीच दशकांपूर्वी २००० मध्ये अमरनाथ बेस कॅम्पवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये ३० जणांचा बळी गेला होता.२००१ मध्ये शेषनागमध्ये तीर्थाटनाला गेलेल्या भाविकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये १३ जण मारले गेले होते. २००२ मध्ये पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यात ११ जणांचा मृत्यू झाला होता. २०१७ मध्ये अमरनाथ यात्रा आटोपून घरी परतत असलेल्या भाविकांवर झालेल्या हल्ल्यात ८ जणांचा मृत्यू झाला होता. तथापि, यावेळच्या हल्ल्यामध्ये पर्यटकांना नावे आणि धर्म कोणता हे विचारून गोळ्या घालण्यात आल्या. त्यामुळे या हल्ल्याला एक वेगळी किनार आहे.वस्तुतः पहलगाममध्ये वापरण्यात आलेली पद्धत पाहिली असता अल कायदा, आयसिस यांसारख्या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना अशा प्रकारची मोडस ऑपरेंडी वापरताना दिसतात. गेल्या काही वर्षांपासून जागतिक समुदायाला भारत एक गोष्ट सातत्याने सांगण्याचा प्रयत्न करत आहे, ती म्हणजे पाकपुरस्कृत दहशतवादाच्या माध्यमातून जम्मू-काश्मीरमध्ये राष्ट्रविरोधी कारवाया करणार्या जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तोयबा यांसारख्या संघटना पाकव्याप्त काश्मीरमध्ये सक्रिय असून तेथून त्या भारतामध्ये दहशतवाद पसरवण्याचे काम करत आहेत. या सर्व संघटना धार्मिक आधारावर दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. या माध्यमातून इतर धर्मीयांनी जम्मू-काश्मीरमध्ये येऊ नये, असे त्यांना सांगायचे आहे. सध्या अमरनाथ यात्रेच्या निमित्ताने मोठ्या संख्येने भाविक या भागातून जाणार आहेत. त्यांना इशारा देणे, त्यांच्या मनात दहशत निर्माण करणे हा पहलगाममधील हल्ल्यामागचा एक प्रमुख तात्कालिक हेतू आहे.दुसरे असे की, या हल्ल्यातून दहशतवाद्यांनी अलीकडील काळात सुरू केलेल्या 'टार्गेट किलिंग'च्या नव्या प्रवाहाला आणखी एक भेदक वळण दिले आहे. धर्म विचारून हत्या करण्यातून दहशतवाद्यांना सर्वसामान्यांच्या मनामध्ये भीती निर्माण करायची आहे. मागील काळात युरोपमध्ये आयसिस या दहशतवादी संघटनेकडून हल्ले करण्यात आले होते. या हल्ल्यांमध्येही सर्वसामान्यांनाच टार्गेट करण्यात आले होते. असे करण्याने संबंध देशभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटतात, माध्यमांमधून प्रसिद्धी मिळते. पाकिस्तानचा हा नेहमीच प्रयत्न राहिला आहे की, जम्मू-काश्मीरमध्ये विशिष्ट वेळा साधून दहशतवादी कारवाया घडवून आणणे. यामुळे काश्मीरच्या प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचा त्यांचा हेतू सफल होतो. गेल्या तीन दशकांचा इतिहास पाहिल्यास पाकिस्तानने नेहमीच भारताच्या दृष्टीने महत्त्वाच्या प्रसंगांवेळी काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ले किंवा शस्त्रसंधीचे उल्लंघन असे प्रकार केलेले आहेत.गतवर्षी पंतप्रधानांचा शपथविधी सोहळा पार पडत असताना, शेजारी राष्ट्रांचे प्रमुख भारतात आलेले असताना दहशतवादी हल्ला झाला होता. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या रशिया दौर्याकडे जगाचे लक्ष लागून राहिलेले असताना त्याआधी कठुआमध्ये हल्ला घडवून आणला होता. सन २००० मध्ये बिल क्लिंटन भारत भेटीवर आले होते आणि भारतीय संसदेत ते भाषण देत होते त्यावेळीही अशाच प्रकारचा हल्ला काश्मीरमध्ये झाला होता. यामागे एक सुनियोजित रणनीती आहे, ती म्हणजे पाकिस्तानला अशा प्रकारचे हल्ले करून काश्मीरच्या प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयीकरण करायचे आहे.

आताही पहलगाममधील हल्ल्याची वेळ पाहिली असता ही बाब स्पष्टपणाने लक्षात येते. अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष भारत भेटीवर आलेले होते. ट्रम्प प्रशासनाचा कार्यभार सुरू झाल्यानंतर पहिल्यांदाच अमेरिकेच्या उपराष्ट्राध्यक्षांचा विदेश दौरा पार पडला आणि यासाठी त्यांनी भारताची निवड केली. त्यामुळे हा दौरा केवळ भारताच्या दृष्टीनेच नव्हे तर जगाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा होता. दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सौदी अरेबियाच्या दौर्यावर गेलेले होते आणि भारत व सौदीमध्ये अत्यंत महत्त्वाच्या करारांवर स्वाक्षर्या होणार होत्या. अशा वेळी इस्लामिक जगतामधील माध्यमे आणि पश्चिमी देशांमधील मीडिया भारतकेंद्री बनलेला होता. ही वेळ साधून पहलगाममधील हल्ला करण्यात आला, जेणेकरून याला जगभरात प्रसिद्धी मिळेल.

दुसरी गोष्ट म्हणजे, गेल्या काही वर्षांमध्ये जम्मू-काश्मीरमधील हल्ले वगळता उर्वरित भारतामध्ये एकही दहशतवादी हल्ला झालेला नाही. सामाजिक वातावरण शांततेचे आहे. कोव्हिडोत्तर काळात जागतिक पर्यटकांचा भारताकडील ओढा वाढत चालला आहे. या सर्व सकारात्मक प्रवाहांना ठेच पोहोचवण्याचा उद्देशही अशा हल्ल्यांमागे असतो. पाकिस्तान या माध्यमातून भारतात अस्थिरता, अशांतता आहे असे दाखवण्याचा प्रयत्न करतो. तिसरी बाब म्हणजे गेल्या दहा वर्षांमध्ये भारतात थेट विदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. जगभरातील गुंतवणूकदारांसाठी भारत हा पसंतीचा देश ठरत आहे. याचे कारण भारत हा जगातील सर्वांत मोठी लोकशाही असणारा देश आहे. अशा परिस्थितीत अशांतता, अस्थिरता निर्माण करून ही गुंतवणूक कमी कशी करता येईल, असा पाकिस्तानचा प्रयत्न असतो.

# हरीसालच्या जंगलात आग

## मानवनिर्मित अग्नितांडव असण्याची शंका



**विर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५धारणी-** २३ एप्रिलच्या दुपार पासून गुगामल वन्यजीव विभागातील मांग्या गावालगत तीन दिशेने आग लागलेली पाहून ग्रामस्थ पार घाबरलेले होते. तत्काळ आगीवर हरिसाल रेंजच्या कर्मचाऱ्यांनी नियंत्रण मिळविले. मात्र, आग लागल्याचे मुळ कारण सध्या तरी अज्ञात आहे.

धारणीपासून ३० किलोमीटर अंतरावरील मांग्या गावालगतच्या तीन दिशेतील तीन जंगलात बुधवारी दुपारपासून ठिकठिकाणी आगी लागल्याने एकच खळबळ उडाली होती. रेंजर गिरीश जतकर यांना या बाबतमाहिती मिळताच आग नियंत्रण पथक मोक्यावर रवाना करण्यात आले. ब्लोअर मशिनचा उपयोग व काही पारंपारिक उपाययोजना करूनतीन-चार तासांत तिनही ठिकाणच्या आगींवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. मात्र, तोपर्यंतया आगीत ६ ते ८ एकर जंगलाची जळून राख झाली. एका माहितीनुसार, एकाच वेळी तीन ते चार ठिकाणावरून आगीचे डोंबर उठताना दिसल्याने आगीचे नेमके कारण समजणे कठीण झाले आहे. सनद असो की, मांग्या गावाचे पुनर्वसन गेल्या पाच वर्षांपूर्वी करण्यात आले आहे. मात्र, स्थानिक काही लोकांनी पुनवर्सित न होता, मांगल्या गावातच कायम राहणे व शेती करणे सुरू केले होते. याविषयावर व्याघ्र प्रकल्प व गावकऱ्यांमध्ये काही काळ तणाव देखिल होता.

मेळघाट व्याघ्र प्रकल्प तथा प्रादेशिक वन विभागाजवळ पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसते. याशिवाय आग लागलेल्या जंगला पर्यंत पोहोचण्यासाठी सुद्धा प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. मांगल्या गावालगतच्या जंगलात आग लागण्याची कारणे लवकरच शोधून काढली जातील, असे रेंजर जतकर यांनी सांगितले.-




# उन्हाळ्याच्या दिवसात कोणती फळे आणि भाज्या एकत्र ठेवू नयेत? जाणून घ्या दुष्परिणाम

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

चांगल्या आरोग्यासाठी फळे आणि भाज्या दोन्ही आपल्या दैनंदिन आहाराचा भाग आहेत. यांच्या सेवनाने शरीराला आवश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजे मिळतात. तसेच आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, दररोज तुमच्या आहारात फळे आणि भाज्यांचा समावेश करावा. त्यात या दोन्ही गोष्टी एकत्र ठेवण देखील आपल्यासाठी खुप महत्वाचे आहे.



आपल्यापैकी अनेकजण त्यांच्या घरात आठवडाभर पुरतील इतका भाजीपाला व फळे बाजारातून घेऊन येतात. अशातच बऱ्याच वेळा लोक या दोन्ही गोष्टी एकत्र साठवतात. पण असे करताना तुम्ही काळजी घेतली पाहिजे. कारण काही भाज्या आणि फळे एकत्र ठेवू नयेत. त्यामुळे या दोन्ही गोष्टी लवकर खराब होतील. चला तर मग आजच्या या लेखात जाणून घेऊयात की कोणते फळ आणि भाज्या एकत्र ठेवू नयेत.

**बटाटे आणि कांदे**

बहुतेक घरांमध्ये बटाटे आणि कांदे एकत्र ठेवले जातात. पण तुम्हाला माहिती आहे का की या दोन्ही गोष्टी एकत्र ठेवू नयेत. कांद्यासोबत बटाटे ठेवल्याने ते लवकर अंकुरतात. कांद्यापासून इथिलीन वायू बाहेर पडतो. यामुळेच बटाटे लवकर खराब होऊ लागतात. त्याच वेळी, बटाट्यांमधून बाहेर पडणाऱ्या ओलाव्यामुळे कांदे देखील कुजू लागतात.

**टोमॅटो आणि काकडी**

भाज्या आणि फळे बहुतेकदा रेफ्रिजरेटरच्या खालच्या भागात ठेवली जातात. काही लोक त्यात काकडी आणि टोमॅटो एकत्र ठेवतात. जर तुम्हीही तुमच्या रेफ्रिजरेटर मध्ये टोमॅटो आणि काकडी एकत्र ठेवले तर आतापासून असे करू नका. टोमॅटोमधून बाहेर पडणाऱ्या इथिलीन वायूमुळे काकडी लवकर होण्यास सुरुवात होते.

**द्राक्षे आणि हिरव्या पालेभाज्या**

हिरव्या पालेभाज्यासोबत कधीही द्राक्ष ठेवू नका. द्राक्ष हे इथिलीनचे समृद्ध स्रोत आहे. यामुळे पालक सुकू शकतो. अशा परिस्थितीत दोन्ही एकत्र ठेवू नका.

**ब्रोकोली आणि टोमॅटो**

ब्रोकोली आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानली जाते. पण जेव्हा आपण बाजारातुन अधिक प्रमाणात ब्रोकोली खरेदी करतो. अशातच लक्षात ठेवा की टोमॅटोसोबत ब्रोकोली ठेवू नका. असे केल्याने ब्रोकोली लवकर पिवळी पडू लागते आणि त्याचे पोषणही कमी होते.

# शेतीसाठी 'ही' सिंचन पद्धत वापरा अन् ९० टक्क्यापर्यंत पाणी बचत करा!




**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

पिकांपासून चांगले उत्पादन मिळविण्यासाठी, योग्य पद्धतीने पाणी देणे महत्वाचे आहे. अलीकडे पाणी देण्याच्या अनेक पद्धती विकसित झाल्या आहेत. मात्र अनेकदा योग्य पद्धतीने सिंचन न झाल्याने शेतकऱ्यांना नुकसानही सहन करावे लागते. यामुळे शेतकऱ्यांना सिंचनाची योग्य पद्धत माहित असणे अधिक महत्त्वाचे आहे.

त्याचबरोबर, देशातील सतत घसरणारी पाण्याची पातळी शेतकऱ्यांसाठी अडचणीचे कारण बनत आहे. शेतकऱ्यांना हे जाणून घेणे महत्वाचे आहे की कोणती सिंचन पद्धत सर्वात जास्त पाण्याची बचत करते? आजच्या लेखातून याबाबत जाणून घेऊयात...

या तंत्रामुळे पाण्याची बचत होईल

सध्या शेतीमध्ये सिंचन करणे सोपे झाले आहे. परंतु वाढत्या पाण्याच्या टंचाई लक्षात घेता, शेतकऱ्यांनी कमी पाण्याचा वापर करून सिंचन तंत्रांचा अवलंब करावा. अशाच एका सिंचन पद्धतीत ठिबक सिंचनाचा समावेश आहे. या पद्धतीने सिंचन केल्यास ९० टक्क्यांपर्यंत पाणी वाचवता येते. या पद्धतीला ड्रॉप-ड्रॉप किंवा ड्रिप पद्धत असेही म्हणतात.

**ठिबक तंत्र म्हणजे काय?**

ठिबक सिंचन पद्धतीत, पाईपद्वारे पाणी हळूहळू रोपांच्या मुळांपर्यंत थेंब थेंब पोहोचते. ज्यामुळे झाडांची मुळे बराच काळ ओलसर राहतात. या पद्धतीत पाण्याचा अपव्यय कमी होतो आणि ही पद्धत कोरड्या भागांसाठी अतिशय योग्य मानली जाते. याशिवाय, ही पद्धत पिके आणि बागांना सिंचन करण्यासाठी वापरली जाते. या पद्धतीत, खते द्रावणाच्या स्वरूपात वनस्पतींच्या मुळांपर्यंत पोहोचवली जातात. ज्या ठिकाणी पाण्याची कमतरता आहे, अशा ठिकाणी ही पद्धत खूप उपयुक्त मानली जाते. या पद्धतीने शेतांना सिंचन करण्यासाठी सरकार अनुदान देखील देत आहे.

**ठिबक सिंचन तंत्रज्ञानाचे फायदे**

ठिबक पद्धतीने केलेले सिंचन हे विद्युत ट्यूबवेल आणि डिझेल पंपांपेक्षा खूपच चांगले आहे. याशिवाय, पाणी भरून सिंचन करण्याच्या तुलनेत, या तंत्राने सिंचन केल्याने सुमारे ९० टक्के पाण्याची बचत होते, ज्यामुळे कमी पाणी असलेल्या भागातही सिंचन सोपे झाले आहे. खरं तर, अशा प्रकारे शेती केल्याने, पाण्याचा थेट परिणाम झाडांवर होतो आणि झाडांना पाण्यापासून संपूर्ण पोषण मिळते. जेव्हा शेतात पाणी साचते तेव्हा तण किंवा गवत अनावश्यक वाढण्याचा धोका जास्त असतो, तर अशा प्रकारे सिंचन केल्याने तण वाढण्याची शक्यता कमी असते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने
देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# महाराष्ट्र दिन शहर परेड मैदानावर साजरा होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती,** महाराष्ट्र राज्याचा ६६वा स्थापना दिवस १ मे रोजी साजरा होणार आहे. यानिमित्त साजरा होणारा मुख्य शासकीय कार्यक्रम जवाहरलाल नेहरू स्टेडीयमऐवजी पोलिस मुख्यालयाच्या शहर परेड मैदानावर सकाळी ८ वाजता होणार आहे.महाराष्ट्र दिनाचा मुख्य शासकीय कार्यक्रम पोलीस मुख्यालय, अमरावती शहर परेड मैदान येथे होणार आहे. यापूर्वी हा कार्यक्रम जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये आयोजित करण्यात येत होता. मात्र स्टेडियमवर ४०० मीटर रनिंग ट्रॅकचे काम सुरू असल्याने कार्यक्रमाच्या स्थळात बदल करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने स्टेडीयम कार्यक्रमासाठी योग्य नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे आता महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिवस पोलिस मुख्यालयाच्या परेड मैदानावर होणार आहे.




# लकी डिजिटल ग्राहक योजने अंतर्गत विश्वास गोटेफोडे ठरले भाग्यशाली वीज ग्राहक



***विदर्भ प्रजासत्ताक***

***दि.२५धा.रेल्वे, -*** *लकी डिजिटल ग्राहक योजने अंतर्गत विश्वास गोटेफोडे भाग्यशाली वीज ग्राहक ठरले असून त्यांना महावितरणतर्फे स्मार्ट फोन हा प्रथम पारितोषिक गुरूवारला (ता.२४) बहाल करण्यात आले.*

*महावितरणच्या लकी डिजिटल ग्राहक योजने अंतर्गत धामणगाव रेल्वे उपविभाग अंतर्गत वीज बिलाचे ऑनलाईन पद्धतीने भरणा करीत असल्या बाबत*

*प्रथम पारितोषिक स्मार्टफोन विश्वास विठ्ठलराव गोटेफोडे यांना देण्यात आला. तर द्वितीय पारितोषिकाचे मानकरी मंगरुळ दस्तगीर येथील श्री. रतन पेट्रोलियम व कासारखेड येथील भगवान डोळे ठरले आहे.तर तृतीय पारितोषिक स्मार्टवॉच तळेगाव दशासर येथील राजेश भीमराव झोपाटे व बी. डि.तायडे यांनी प्राप्त केले आहे.यावेळी महावितरण उपविभाग धामणगाव रेल्वे अंतर्गत उप कार्यकारी अभियंता,श्री उमरे, सहाय्यक अभियंता श्री कनाठे,श्री परतेकी, श्री वाघ,श्री लोणकर,श्री सहारे उपस्थित होते.*

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २५ एप्रिल २०२५ शहर/ग्रामिण





# राजापेठ चौकात भाजपा,युवा स्वाभिमान कडून सामूहिक श्रद्धांजली, शेकडो नागरिक उपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती** जम्मु काश्मिर मधिल पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांना भाजपा नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टी व युवा स्वाभिमान पार्टीतर्फे सामुहिक मौन श्रद्धांजली वाहण्यात आली. जखमी नागरिक लवकरात लवकर बरे व्हावे, याकरिता प्रार्थना केली.दहशतवाद्यांनी मुद्दाम हिंदुंना लक्ष करुन केले ठार, जो देश दहशतवाद्यांना आश्रय देतो त्याचा अंत निश्चित, आम्ही आधीही घाबरत नव्हतो आजही घाबरत नाही, पाकिस्तानला आता दाण्यादाण्याला मौताद करु, असा हल्लाबोल नवनीत राणा यांनी श्रद्धांजली अर्पण करताना पाकिस्तानवर केला. भारतीय जनता पार्टी व युवा स्वाभिमान पार्टीच्या दाधिकारी व कार्यकत्यांनी संताप व्यक्त करत पाकिस्तान विरोधात तीव्र बोषणा दिल्या.

श्रद्धांजलीचा कार्यक्रम राजापेठ येथे घेण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सरकार तातडीने पाऊल उचलुन जे निर्णय घेतले ते पाकिस्तानला नाकी नऊ आणणारे निर्णय असतील, असे त्या म्हणाल्या.

पाकिस्तानला दाण्यादाण्याला मौताद करु, असेही यावेळी त्यांनी सांगितले. पाकिस्तान दहशतवाद्यांना आश्रय देऊन व त्यांना हल्ले करण्यासाठी प्रेरित करुन हिंदुस्तानचे स्वप्न उध्वस्त



करण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु पाकिस्तानचा हा मनसुबा भारतीय पुर्ण होऊ देणार नाही. पाकिस्तानमध्ये घुसून सडेतोड उत्तर देऊ, असेही त्या म्हणाल्या. उपस्थितांनी हातात कॅन्डल जाळुन मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली दिली. यावेळी जयंतराव वानखडे, प्रा.अजय गाडे, नाना आमले, सुनिल काळे, ललीत समदुरकर, राजु कुरील, मिलींद बांबल, कुसुम साहु, शिल्या पाचरे, सतनाम कौर हुडा, पराजा कौडाथ, बलदेव बजाज, सुमतीताई ढोके, उमेश ढोणे, विनोद गुहे, बाळु इंगोले, भगेश इंगोले, अर्चना तालन, सचिन भेंडे, विजयताई घोडेस्वार, सुखदेव तरडेजा, शैलेंद्र कस्तुरे, ॲड. दिप मिश्रा, श्याम कथे, महेश किल्लेकर, अविनाश काळे, अजय घुले, गोपाल मिश्रा, संगिता बुरंगे, श्याम हिंगासपुरे, पुष्पलता चेचरे, मेघा हिंगासपुरे, अनिता टिकले, आशिष गावंडे, वंदना जामनेकर, अशोक पांडे, प्रणिता शिरभाते, रोहन शर्मा, आकाश खडसे, प्रदिप अलोने, सुरज मिश्रा, महेश मुलचंदानी, कुणाल गुप्ता, सिमा डोळे, आशा भस्मे, रामकृष्ण डोळे, संध्या तिवारी,रोशनी लुचाईवाले, माला खामुडे, कल्पना बनकर, मंगला जाधव, स्वाती जगदाळे, रोशनी शेटे, समिक्षा गोटेफोडे, सारिका अवघड, सुखदेव कराडे, ओंकार मोहोड, घनश्याम डकरे, दिलीप भाकरे, प्रमोद सोनवणे, गौरव सेठिया, साक्षी उमक, राजु रॉय, माहनंदा कातोरे, प्रेमा लव्हाळे, मंदा तायडे, मुकेश गिरी, मकसूद भाई, प्रतिभा महाजन, सागर लोखंडे, निता खडसे, संजय चौधरी, गंगाधर आवारे, शुभम उंबरकर, श्रीकृष्ण बैलमारे, माया लकडे, मिना वाघमारे, राजेंद्र भस्मे-सविता नेवारे, क्रांती जगदाळे, मयुरी नेवारे, मोकाशे ताई, पाटेकर ताई मोलखे ताई व असंख्य पदाधिका उपस्थित होते.

# राष्ट्रवादी कॉंग्रेसने घोषणा देऊन केला निषेध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती** – राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र बाबासाहेब पवार गटाने डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन करून भ्याड हल्लृयात मृत पावलेल्या पर्यटकांना मेणबत्ती लावून श्रद्धांजली वाहिली.

दहशतवादी भ्याड हल्लृयाचा जाहीर निषेध असो च्या घोषणा देण्यात आल्यात. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे शहर जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, गणेश राय, नितीन देशमुख, वर्षा भटकर, सय्यद मंसूरी, राजेंद्र चिंचमलातपुरे, डॉ. रोशन अडक, ॲड. धनंजय तोटे,प्रदीप राऊत, रावसाहेब वाटाणे, कृष्णराव चौधरी, प्रा. दीपक देशमुख, मोबीन मजीत, लोकेश माला, विशाल बोरखडे, सतीश देशमुख, वर्षा



गतफणे, मंगेश भटकर, दिलीप वऱ्हाडे, अनिल गुप्ता, सतीश चरपे, वसंत पाटील, अनिस खान, राजेश चवरे, ॲड. रवी खडसे, प्रतीक देशमुख, भूषण लोणारे, प्रदीप चौधरी, अमित गावंडे, राहुल चौधरी, मंगेश अर्डक, रोहित चौधरी, राजेश फुले, नितीन भोजे, वेदांत उगले, शुभम शेगोकार, अरबाज पठाण, अक्षय ढोले, रोहित दीवटे, गौरव वाटाणे, राहुल उरकुडे, सह कार्यकर्ते उपस्थित होते.

### दहशतवाद निर्मूलनाचा दावा फोल : डॉ. हेमंत देशमुख

कश्मीर येथे झालेल्या हल्लृयामुळे पर्यटकांमध्ये भीती निर्माण झाली आहे. केंद्र सरकारचा दहशतवाद निर्मूलन झाल्याचा दावा फोल ठरला. त्यांनी कोणाविषयी वाईट बोलताना जीभ आवरावी व सामाजिक स्वास्थ बिघडू देऊ, नये अशी प्रतिक्रिया शहर जिल्हाध्यक्ष हेमंत देशमुख यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना दिली.

# २१ मे ला राजीव गांधी कृषी रत्न पुरस्काराचे वितरण

## शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन २१ ते २७ मे पर्यंत पुरस्कार देण्यात येणार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**
भारताचे माजी पंतप्रधान विज्ञान क्रांतीचे जनक स्व. राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त २१ मे रोजी राज्यस्तरीय राजीव गांधी, कृषी रत्न पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना त्यांच्या बांधावर जाऊन २१ ते २७ मे पर्यंत पुरस्कार देण्यात येतील. यावर्षी राज्यभरातील विविध प्रांतामधून २१ शेतकरी निवडले जाणार असून ३०० पेक्षा अधिक प्रस्ताव येण्याची शक्यता राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश साबळे यांनी वर्तवली आहे.

गुरुवार २४ एप्रिल रोजी पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी सांगितले की, हा पुरस्कार सोहळा २१ ते २७ मे पर्यंत शेतकरी समान सप्ताह म्हणून साजरा करणारआहे. सन २००७ पासून सातत्याने हा उपक्रम सुरू असून आतापर्यंत २७० प्रगतिशील शेतकरी कृषी कंपनी शेतमजूर कृषी वैज्ञानिक कृषी उद्योजक कृषी पत्रकार, महिला शेतकऱ्यांना प्रदान करण्यात आला आहे.

राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या पुरस्कार वितरण सोहळ्याकरिता दहा मान्यवरांची राज्यस्तरीय आयोजन समिती नियुक्त करण्यात आली आहे. राज्यस्तरीय आयोजनामध्ये प्रगतिशील राज्यातील शेतकऱ्यांचे पुरस्कारासाठी जवळपास ३०० प्रस्तावने अपेक्षित आहे. स्वर्गीय राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित हा एकमेव कार्यक्रम आहे कृषी क्षेत्राला विज्ञानाची जोड देऊन देशातील शेतकऱ्यांना प्रगतीचे नवे दालन उभे करण्याचे महत्त्वाचे कार्य स्व. राजीव गांधी यांनी केले होते.

सर्व शेतकरी समाजाच्या वतीने २१ मे रोजी राजीव गांधी यांना अभिवादन करून श्रद्धांजली अर्पण करण्यात येईल व त्यानंतर शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येतील.२१ प्रयोगशील शेतकऱ्यांमध्ये शेतकरी महिला शेतकरी, कृषी वैज्ञानिक उत्कृष्ट तिफनकरी, उत्कृष्ट उद्योजक, फार्मर प्रोडूसर कंपनी तसेच कृषी पत्रकारिता अशा पद्धतीने पुरस्काराची निवड करण्यात येणार आहे. राजीव गांधी कृषी प्रतिष्ठानने शेतकऱ्यांची निवड करण्यासाठी राज्य शासनाच्या जिजामाता कृषी भूषण पुरस्कार महिला शेतकरी व ग्रामगीताचार्य पौर्णिमा सवाई यांच्या अध्यक्षतेखाली १६ कृषी तज्ञांची शेतकरी समिती नेमली आहे. दहा मेपर्यंत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांची निवड करणार आहेत. यावर्षीच्या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याची सुरुवात २१ मे रोजी सकाळी नऊ वाजता बैलजोडी पूजनाने होणार आहे. अमरावती तालुक्यातील अंबाडा गाव या गावातून उत्कृष्ट बैल जोडी मालक शेतकऱ्यांचा सन्मान व बैलजोडी पूजन केले जाईल. त्यानंतर सोहळ्याचा समारोप २७ मे रोजी राजीव गांधी शेतकरी सद्भावना पुरस्कार देऊन करण्यात येईल. पत्रपरिषदेमध्ये प्रकाश साबळे यांच्यासह पौर्णिमा सवाई, काशिनाथ फुटाणे, डॉ. दिलीप काळे, जयसिंगराव देशमुख, रोशन हाडोळे, भय्यासाहेब निचळ, भय्यासाहेब मेटकर, मिलिंद फाडके, प्रशांत डहाने, अविनाश पांडे, अनिल ठाकरे, जावेद खान, हेमंत डिके, अमर तायडे, नामदेव वैद्य उपस्थित होते.

### विशेष कृषी पुरस्कार

प्रकाश साबळे यांनी सांगितले की, यावर्षी विशेष कृषी पुरस्कार देण्यात येणार आहे. ज्यामध्ये शेतकरी सन्मान मित्र पुरस्कार, दुग्ध उत्पादक शेतकरी, उत्कृष्ट कृषी अवजार संस्था, उत्कृष्ट बैलजोडी मालक, उत्कृष्ट शेतकरी मित्र कृषी अधिकारी, फळबागातदार प्रगतिशील आदिवासी शेतकरी, बियाणे संशोधक, फुल शेती उत्पादक शेतकरी, वन औषधी उत्पादक शेतकरी, उत्कृष्ट गाव कारभारी सरपंच, उत्कृष्ट मत्स्य पालन व्यवसाय, रानभाजी उत्पादक शेतकरी, सेंद्रिय शेती उत्पादक शेतकरी, युवा शेतकरी अशा प्रवर्गातील शेतकऱ्यांना विशेष कृषी कार्य पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

# अधिकारी, कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या गावाचा सर्वांगीण विकास करावा : संजिता महापात्र

## राष्ट्रीय पंचायतीराज दिनानिमित्त राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान कक्षाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**
जिल्हा परिषदेच्या प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपल्या स्वतःच्या गावाचा सर्वांगीण विकास करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी केले.

राष्ट्रीय पंचायतीराज दिनानिमित्त राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान कक्षाच्या उद्घाटन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. भारतातील ७० टक्के जनता ग्रामीण भागात राहते. त्यांच्या विकासाची जबाबदारी आपली. म्हणूनच जिल्हा परिषदेला मिनी मंत्रालयसुध्दा म्हटले जाते. त्यामुळे जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत प्रत्येक कर्मचाऱ्याने स्वतः चे गावच आदर्श करावे, आपोआप जिल्ह्यातील १ हजार पेक्षा जास्त गावे विकसित होतील, असेही त्या यावेळी म्हणाल्या. सत्तेच्या विकेंद्रीकरणाने गावाला विकासाच्या वाटा मोकळ्या आहेत त्यातआपण त्याच संस्थेत काम करतोय या भावनेने आपण ग्राम विकासात स्वतः ला झोकून द्यावे, असे आवाहन त्यांनी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना केले.भारत सरकारच्या पंचायती राज



मंत्रालयाच्या सुचनांनुसार २४ एप्रिल २०२५ रोजी राज्यातील सर्व त्रिस्तरीय पंचायतराज संस्थामध्ये राष्ट्रीय पंचायत राज दिवस साजरा करण्याबाबत तसेच सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा आयोजनाच्या सुचना प्राप्त होत्या. अमरावती जिल्हा परिषदेअंतर्गत १४ पंचायत समिती व ८४१ ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभेचे आयोजन करून राष्ट्रीय पंचायत राज दिवस साजरा करण्यात आला.

जिल्हास्तरिय कार्यक्रमाचे आयोजन डॉ पंजाबराव देशमुख सभागृह जिल्हा परिषद अमरावती या ठिकाणी संजीता महापात्र यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यातआले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालासाहेब बायस यांनी केले. या प्रसंगी महिलास्नेही, स्वच्छ व हरित गाव संकल्पना, नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आलेल्या ग्रामपंचायतीचे सरपंच धर्मेंद्र मेहरे (उत्तमसरा, पंचायत समिती भातकुली), योगिता रिठे (प्रिंप्री निपाणी, पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर) व मनिषाताई वरघट (देवरा, पंचायत समिती भातकुली) यांचासत्कार करण्यात आला. तसेच कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मधुबनी बिहार येथुन पंचायतराज दिवसाबाबत सुरु असलेले थेट प्रक्षेपण करण्यात आले. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे सर्व खाते प्रमुख, सर्व कर्मचारी व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदिप बद्रे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान कक्षाने केले.–

# शिवशाही बस सुरु करताच इंजिनने घेतला पेट

## बसस्थानकावरील घटना : प्रवासी सुखरुप, अनर्थ टळला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५ वरुड–** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या रुड बसस्थानकावर गुरूवारी ता. २४) सायंकाळी ५.३० च्या मारास अमरावतीकडे जाण्याकरीता बावशाही बस चालकाने सुरु करताच सच्या इंजिनमधून घुर निघायला बागला. बसच्या इंजिनच्या भागामध्ये बाग लागल्याचे चालकाचे लक्षात ताच चालकाने तातडीने वाहक नाणि प्रवाशांना माहीती दिली आणि वं प्रवाशांना बसमधून सुखरुप खाली तरविण्यात आले. अग्नीशामक त्राव्दारे इंजिन परिसरात लागलेलीआग विझविण्यात आल्याने पुढील अनर्थ टळला.गुरुवारी सायंकाळी ५.३० च्या सुमारास वरुड च्या बसस्थानकावरशिवशाही बस क्रमांक




एम.एच.०९ ई एम १९६१ अमरावतीकडे जाण्याकरीता उभी झाली. बसस्थानकावर बस लागताच अमरावतीकडे जाणाऱ्या प्रवाशांनी बसमध्ये प्रवेश घेतला. बस निघण्याची वेळ झाल्यानंतर चालकाने गाडी सुरु करताच बसच्या इंजिन असलेल्या भागातून बसने पेट घेतला. बसस्थानकावर उपस्थित कर्मचारी बांधवानी तातडीने आग विझविण्याचा प्रयत्न केला व प्रवाशांना गाडीमधून सुखरुप उतरवून दिल्याने जीवितहानी झाली नाही. प्रसंगावधान ठेऊन कर्मचाऱ्यांनी वेळेवर मदत केल्यामुळेच पुढील अनर्थ टळला.

# नेरुळमध्ये २२ वा श्रीकृष्ण मंदीर वर्धापन दिन सोहळा प.पू. कारंजेकर बाबांचा सेवारत्न पुरस्काराने सन्मान

## २७ एप्रिल रोजी नेरुळमध्ये धर्मसभेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**
श्रीकृष्ण मंदीर, नेरुळ २२ वा वर्धापन दिन सोहळा तसेच मुंबई व उपनगर महानुभविय संस्थेकडून दिला जाणारा सेवारत्न पुरस्कार सोहळा रविवार २७ एप्रिल २०२५ रोजी नेरुळ येथे आयोजित केला आहे. श्रीकृष्ण चक्रधर सेवा मंडळ ट्रस्ट, नेरुळ (नवी मुंबई) तसेत मुंबई आणि उपनगर महानुभव पंभीय संस्थेतर्फे हा सोहळा होत आहे.

वर्धापन दिन तसेच सेवारत्न पुरस्कार सोहळ्यात रविवारला सकाळी ९ ते १० वाजता कवीश्वर कुलाचार्य प. पू. प. म. श्री. कारंजेकरबाबा राजापेठ, अमरावती यांच्या पीढीतील देवपुजा वंदन, प्रसाद वंदन होईल. त्यानंतर सकाळी १० ते १२ वा. दरम्यान कवीश्वर कुलाचार्य प. पु. प. म. श्री. कारंजेकरबाबा राजापेठ,



अमरावतीची धर्मसभा व मुंबई आणि उपनगर महानुभव पंथीय संस्थाकडून सेवारत्न पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. दुपारी १२.०० ते २.०० वा. पर्यंत विडा अवसर, आरती, उपहार, महाप्रस-- ादाचे आयोजन केले आहे. या सोहळ्याला – प्रमुख उपस्थिती प.पु.प.म. श्री.सागरबाबातळेगावकर महानुभाव (उल्हासनगर) प.पु.त. राणीताई महानुभाव (वडाळा, मुंबई) तपस्वीनी शोभाताई महानुभाव (वडाळा, मुंबई) प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे. श्रीकृष्ण मंदिर, प्लॉट नं. ४९, सेक्ट- १९, नेरुळ येथे होणाऱ्या य सोहळ्याला सर्व ईश्वर भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन व्यवस्थापक प.पु.प.म.श्री. कृष्णराजबाबा वायंदेशकर (९३७२१८७९३२) यांनी केले आहे.

# हलगर्जीपणाने महिलेसह बाळाचा मृत्यू!

## नातेवाईकांचा नवजीवन हॉस्पिटलमध्ये राडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५दर्यापूर**
येथील प्रसिद्ध नवजीवन हॉस्पिटलमध्ये प्रसूती करिता दाखल महिलेची प्रकृती गंभीर होत असल्याचे बघून तातडीने अकोला येथील शासकीय रुग्णालयात घेऊन जाण्याचे सांगण्यात आले. मात्र, मार्गातच महिलेचा व तिच्यापोटातील बाळाचा मृत्यू झाला. संतापलेले नातेवाईक नवजीवन हॉस्पिटलमध्ये जाब विचारण्यासाठी गेले. जमाव बघून डॉक्टर निघून गेले. यावेळी चिडलेल्या नातेवाईकांनी पोलिस स्टेशन मध्ये जाऊन डॉक्टरवर कारवाई करण्याची मागणी केली.



तालुक्यातील कळाशी येथील वर्षा दीपक कुटेमाटे (वय २५) या महिलेची दुसरी प्रसूती करण्यासाठी तिच्या कुटुंबीयांनी नवजीवन हॉस्पिटलमध्ये तिला दाखल केले. दोन दिवस उपचार घेतल्यानंतर प्रकृती स्वास्थ्य लाभत नसल्याचे लक्षात आल्याने कुटुंबीयांनी डॉक्टरांकडे विचारणा केली. डॉक्टरांनी यावर मी उपचार करतो असे सांगत महिलेला विविध औषधांचा डोस दिला असल्याचे तिच्या कुटुंबीयांनी सांगितले. काळीवेळाने महिलेची प्रसूती ही सिजर करावी लागते असे सांगून आपल्याकडे ती व्यवस्था नसल्याचे सांगत तातडीने या महिलेला दुसर्या रुग्णालयात घेऊन जाण्याचे डॉ. रवींद्र साबळे यांनी सांगितल्यावर कुटुंबीय चिडले.

त्यांनी डॉक्टरांना जाब विचारला, मात्र त्यांची समजूत काढत महिलेला तातडीने अकोला येथील शासकीय रुग्णालयासाठी रवाना करण्यात आले. सदर महिला अकोला रुग्णालयात पोहोचताच डॉक्टरांनी तपासल्यानंतर मृत घोषित केले. नातेवाईकांनी मृतदेहासह नवजीवन हॉस्पिटल गाठत डॉक्टरांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला. नातेवाईक पोलिस ठाण्यावर धडकले. डॉक्टरवर कारवाई झाल्याशिवाय आम्ही मृतदेह उचलणार नसल्याचे सांगितल्याने तणाव वाढला. अखेर पोलिसांनी मध्यस्थी करत तक्रार दाखल करून घेतली.

### उपचारात चूक नाही

सदर महिला माझ्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होती. त्यांच्यावर योग्य उपचार करण्यात आले. तिची प्रकृती अगोदरच क्रिटिकल झाली होती. प्रसूती सिझरियन होणार असल्याचे लक्षात आल्याने आम्ही नातेवाईकांना याबाबत सूचित केले. आमच्या हॉस्पिटलला भूलतज्ञ सुद्धा उपस्थित नसल्याने सदर महिलेला दुसर्या हॉस्पिटलला घेऊन जाण्याबाबत सांगितले. उपचारांमध्ये आमच्याकडून कोणतीही चूक झालेली नाही.

**–डॉ. रवींद्र साबळे**
**संचालक, नवजीवन हॉस्पिटल**

### डॉक्टरांचा हलगर्जीपणा

माझ्या पत्नीला मी नवजीवन हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल केले होते. डॉक्टरांनी योग्य उपचार पद्धती अवलंबली नाही. प्रकृती अस्वस्थ झाल्यावर ऐनवेळी पत्नीला दुसर्या दवाखान्यात न्यावे असे सांगण्यात आले. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच माझ्या पत्नीचा व बाळाचा मृत्यू झाला. आम्ही पोलिसांना तक्रार दिली आहे.

**–दीपक कुटेमाटे मृतक महिलेचा पती**

# ग्रा.पं. सार्शी येथे जिल्हाधिकारी यांच्या शुभहस्ते कुरण गवत कापणीचा शुभारंभ

## मनरेगा अंतर्गत गुरांकरिता गवत लागवडीचा पहिला प्रयोग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती, –**
अमरावती जिल्ह्यातील सार्शी (गाईची) येथे कुरण (चारा) गवताचा प्रोजेक्ट नावीन्य पूर्ण आहे.हा प्रोजेक्ट अमरावती जिल्ह्यातील सार्शी या गावी पहिल्यांदा राबवल्या गेला कुरण गवताच्या कुरण गवत शुभारंभा करिता जिल्हाचे जिल्हाधिकारी सौरव कटियार यांच्या शुभहस्ते कुरण गवत कापणीचा शुभारंभ करण्यात आला



यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मयूर कळसे तहसीलदार तिवसा तसेच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे साहेब तसेच गावचे सरपंच सौ रिना पुरुषोत्तम मंजू, उपसरपंच नंदूभाऊ तेलमोरे, ग्रामपंचायत मधील सर्व सदस्य,ग्रा.प सार्शी चे ग्रामपंचायत अधिकारी कु. निकिता ज्ञानेश्वर वानखडे नरेंद्र पवार ग्रामपंचायत अधिकारी, , मनरेगाचे सर्व अधिकारी , इंगळे साहेब मंडळ अधिकारी, वैभव देशमुख पटवारी साहेब , शाळेचे मुख्याध्यापक आशाताई, अंगणवाडी सेविका, ग्रामरोजगार सेवक , ग्रामपंचायतचे कर्मचारी तसेच गावातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होते नावीन्यपूर्ण चांगला उपक्रम असल्यामुळे जिल्हाधिकारी साहेबांकडून गावाचे तसेच उपक्रमाचे कौतुक करण्यात आले. तसेच कार्यक्रम सर्वांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

# अमरावतीमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा




## जिल्हा प्रशासनाकडून मार्गदर्शक सूचना जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती–** अमरावतीमध्ये उष्णतेच्या लाटांचा इशारा देण्यात आला आहे. जिल्ह्यामध्ये गेल्या ४ ते ५ दिवसांपासून तापमानात वाढ होत आहे. उष्णतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी जिल्हा प्रशासनाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. उष्णतेचा त्रास कमी करण्यासाठी दुपारी १२ ते ३ या वेळेत उन्हात जाणे टाळावे, पुरेसे पाणी प्यावे, हलक्या रंगाचे सुती कपडे वापरावे, बाहेर जाताना छत्री, टोपी किंवा गॉगल वापरावे, मद्य, चहा, कॉफी आणि शीतपेये पिणे टाळावे, शिळे अन्न खाऊ नये, उन्हात काम करताना चेहरा आणि डोके ओल्या कपड्याने झाकावे, शक्यतो, दुपारी १२ ते ३ या वेळेत जास्त शारीरिक श्रम करणे टाळावे, चक्कर आल्यास किंवा अस्वस्थ वाटल्यास त्वरीत डॉक्टरांना भेटावे, ओआरएस आणि लस्सी, ताक, लिंबू पाणी यासारखी पेये प्यावे, प्राण्यांना सावलीत ठेवावे आणि त्यांना भरपूर पाणी द्यावे. त्याचप्रमाणे दुपारी १२ ते ३ या वेळेत उन्हात जाणे टाळावे, गडद रंगाचे जाड कपडे घालू नये, तापमान जास्त असल्यास जास्त शारीरिक श्रमाची कामे करू नये, तसेच उष्माघात झालेल्या व्यक्तीची काळजी घेताना उष्माघात झालेल्या व्यक्तीला थंड ठिकाणी घेऊन जावे, त्याच्या शरीराचे तापमान कमी करण्याचा प्रयत्न करावे, शरीर थंड पाण्याने पुसावे, ओआरएस आणि लस्सी, ताक, लिंबू पाणी यासारखी पेये द्यावे, तातडीने आरोग्य केंद्रात घेऊन जावे. उष्माघात हा जीवघेणा ठरू शकत असल्यामुळे तातडीने उपचार सुरु करणे आवश्यक आहे, तसेच उन्हाळ्याच्या दिवसात नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# अंजनगाव सुर्जीचे उपकोषागार कार्यालय वाऱ्यावर; अधिकारी फिरकेना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अंजनगाव सुर्जी**
–प्रत्येक जिल्ह्याला कोषागार, तालुका पातळीवर उप–कोषागर कार्यालय असते. या कार्यालयांतून बरेच व्यवहार होतात. त्यातून शासनाला मोठा महसूल प्राप्त होतो. परंतु येथील उपकोषागार कार्यालय वार्यावर सोडल्यागत आहे. येथे कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी पूर्णवेळ बसत नाही. त्यामुळे नागरिकांना हवी असलेली सुविधाही मिळत नाही. परिणामी नागरिकांनी असंतोष व्यक्त केला असून, हे कार्यालय सुरळीत सुरु ठेवावे, अशी मागणी केली. अंजनगाव तालुक्याच्या उप–कोषागार कार्यालयात स्टँम्प व कोर्टफी स्टँम्पचा तुटवडा आहे. अशा स्थितीत सोमवार २१ एप्रिल हा



आठवड्याचा पहिला दिवस होता. परंतु त्याच दिवशी हे कार्यालय बेवारस स्थितीत होते. तेथे कुणीही अधिकारी–कर्मचारी नव्हते. कर्मचार्यांच्या अनियमिततेमुळे नागरिकांना तासन् तास ताटकळत बसावे लागले. हे कार्यालय तहसील कार्यालयाच्या आवारात आहे. या कार्यालयातून वेतन, शासकीय वसुली, बजेट नियंत्रण, वैद्यकीय देयके, सर्व प्रकारचे स्टँप, अंशदान, पेन्शन, स्टँप वरील कमीशन अशी शासकीय कामे हाताळली जातात. येथे कोषागार अधीकारी म्हणुन मधुकर चव्हाण, लिपीक मराठे व एक पोलिस गार्ड कार्यरत आहे. परंतु बर्याचदा गार्डशिवाय कार्यालयीन कर्मचार्यांची वानवा असते. विशेष असे की कर्मचार्यांचे विरोधात तक्रार दिली तर नंतर ते त्रास देतील म्हणून कोणीही पुढे येत नाही. त्यामुळे या कर्मचार्यांचे फावत आहे. दरम्यान कर्तव्य पार न पाडणार्‍या अधिकारी, कर्मचार्यांवर वरिष्ठ अधिकार्‍यांनी कारवाई करावी, अशी मागणी पुढे आली आहे.

# चांदूरबाजार तालुक्यात सरपंचपदाची सोडत जाहीर

## ६६ पैकी ३४ ग्रामपंचायतींवर राहणार 'महिलाराज'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५चांदूर बाजार–**
तालुक्यातील ६६ ग्रामपंचायतींसाठी सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत नुकतीच जाहीर झाली आहे. यामध्ये विशेष बाब म्हणजे ३४ ग्रामपंचायतींचे सरपंचपद महिलांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. ही सोडत प्रक्रिया पारदर्शकपणे तहसील कार्यालयात पार पडली.



महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमानुसार, महिलांसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. याशिवाय, अनुसूचित जाती, जमाती आणि मागासवर्गीयांसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. या सोडतीमुळे तालुक्यातील राजकीय वातावरण तापण्यास सुरुवात झाली आहे. अनेक इच्छुकांनी उमेदवारीसाठी गावपातळीवर तयारी सुरू केली आहे. निवडणूक प्रक्रिया लवकरच्च सुरू होणार असून, येत्या काही दिवसांन तहसील कार्यालयातून अधिक माहितीजाहीर होईल.शेतकरी आणि ग्रामस्थांमध्येही या निवडणुकी बाबत उत्सुकता आहे, कारण स्थानिक नेतृत्व गावाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावते. सर्कापूर बेलमंडळी, कल्लोडी, रेडवा, सुरळी, जवळा शहापूर, आसेगावपूर्णा, मिर्जापूर, वाठोडा, तळणीपूर्णा, फुबगाव, चिंचोली काळे, राजुरा, कुऱ्हा (या ग्रामपंचायती अनुसूचित जाती महिलांसाठी) देऊरवाडा, निंभोरा, तळेगाव मोहना (अनुसूचित जमाती), ब्राह्मणवाडा थडी, करजगाव, बेसखेडा (अनुसूचित जमाती महिला), थुगाव, पिंपरी, खराळा, शिरसगाव कसबा, जसापूर, कुंडवर्धा वडुरा (नामाप्र), काजळी, आखतवाडा, ब्राह्मणवाडा पाठक, धानोरापूर्णा, तुळजापूर गढी (नामाप्र महिला) विश्रोळी, वणी, बेलखेडा, शिरजगाव बंड, नानोरी, निमखेड, बोदड, बेलज, तोंडगाव, लाखनवाडी, पिंपरी थुगाव, टाकरखेडा पूर्णा, वेरूळपूर्णा, रसुलापूर, राजनापूर्णा, बोराळा जैनपूर ( सर्वसाधारण) घाटलाडकी, जालनापूर, सोनोरी हैदतपूर, दहिगावपूर्णा, खरवाडी, बेलोरा, कुरणखेड, कारंजा बहिरम, गोविंदपूर, रतनपूर, बोरगाव मोहना, वेरूळपूर्णा, कुरळपूर्णा मासोद कृष्णापूर, तळवेल (सर्वसाधारण महिला) याप्रमाणे सोडत जाहीर करण्यात आली आहे.

### असे आहे आरक्षण अनुसूचित जाती

खुला १५, महिला ८
अनुसूचित जमाती : खुला ६, महिला के मागास प्रवर्ग : खुला १२, महिला ६
सर्वसाधारण : खुला ३३, महिला– १७

# शिवसेना उबाठाच्या महिलांनी एसडीओंना भेट दिली चूल

## सरकारला जाहीरनाम्याची आठवण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५दर्यापूर–** दर्यापूर येथे शिवसेना (उबाठा) पक्षाच्या महिला कार्यकर्त्यांनी गॅस सिलिंडर दरवाढीविरोधात अनोखे आंदोलन केले. त्यांनी एसडीओ कार्यालयात जाऊन उपविभागीय अधिकारी राजेश्वर हांडे यांना प्रतीकात्मक चूल भेट दिली.

केंद्र सरकारने घरगुती गॅस सिलिंडर आणि उज्वला गॅस योजनेत ५० रुपयांची वाढ केली आहे. महिला कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, २०१४ मध्ये ५०० रुपयांना मिळणारा सिलिंडर आता ९०० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. यामुळे गृहिणींचे घरखर्चाचे नियोजन कोलमडले आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या महिला आघाडी जिल्हाप्रमुख अलका निलेश पारडे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. शहर प्रमुख गोपाल अग्रवाल आणि अखिल भारतीय धनगर समाज महासंघाच्या विदर्भ अध्यक्षा प्रा. संगीता पुंडे यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

आंदोलकांनी सरकारवर टीका केली की, केरोसीन बंद केले आहे. झाडे तोडण्यावर बंदी असल्याने सरपणही आणता येत नाही. महिलांनी सरकारला निवडणूक जाहीरनाम्याची आठवण करून दिली. त्या म्हणाल्या की दरवाढ अशीच सुरू राहिली तर चुलीवर स्वयंपाक करण्याचे दिवस दूर नाहीत.

या आंदोलनात येवदा पंचायत समिती सर्कल प्रमुख भावना सोळंके, गायत्री नगर महिला आघाडी शाखा प्रमुख सुनीता मांडवे, उपशहर प्रमुख संगीता चवळे, कविता मालवे, विद्या बयस, संगीता बनारसे यांच्यासह अनेक महिला सहभागी झाल्या होत्या.–



# सहसंचालक प्रदीप घुले यांना प्रशासकीय गतिमानता पुरस्कार प्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती,**
– व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सहसंचालक प्रदीप घुले यांना राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यांना 'उत्कृष्ट आयटीआय, रोजगार मेळावे, संवाद फोरम' उपक्रमासाठी १० लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक देण्यात आले. राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान आणि स्पर्धा २०२४–२५ या वर्षातील राज्यस्तरीय पारितोषिकांमध्ये विभागीय



स्तरावरील निवड समित्यांकडून प्राप्त प्रस्तावामधून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, क्षेत्रीय कार्यालयाच्या उपक्रमांची प्रथम पारितोषिकासाठी निवड करण्यात आली. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. पारितोषिक विजेत्यांना मिळालेली रकम कार्यालयाची सुधारणा किंवा स्पर्धेत पाठवलेल्या प्रस्तावाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी करावी लागणार आहे.–

# १२० वर्षातील सर्वात उष्ण एप्रिल



## आजवरचे सर्व विक्रम मोडणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती–** यंदाचा एप्रिल महिना हा गत १२० वर्षांतील आजवरचे सर्व विक्रम मोडणारा ठरेल, असा अंदाज हवामानशास्त्रज्ञांनी वर्तवला आहे. आजवर २०२४ हे वर्ष सर्वाधिक उष्ण ठरले होते. उन्हाळ्यात पडणारा सरासरी पाऊस न पडल्याने यंदा तापमान दरवर्षी इतकेच असले तरी एकूण उष्मा (टोटल हिट कंटेंट) प्रचंड वाढला आहे. उष्णता आणि बाष्पीभवन यामुळे 'हिट डिस्कंफर्ट' वाढला आहे. त्यामुळे सर्वत्र उष्णतेची लाट उसळल्याने घरात राहूनही लोकांना उष्णतेच्या विकारांनी ग्रासले आहे.

महाराष्ट्रासह देशातील सर्वच राज्यात एप्रिलमध्ये अतितीव्र स्वरूपाची लाट सक्रिय झाली असून बाहेर पडणे सोडाच, घरातही पंखा आणि कुलर सुरू असला तरी बसवत नाही, इतका तीव्र उन्हाळा आहे, अशी प्रतिक्रिया राज्यातील सर्वसामान्यांची आहे. हवामान शास्त्रज्ञ म्हणतात, कीं –ळिश्र यंदा मुंबईसह राज्यात सर्वत्र फेब्रुवारीमध्येच पहिली उष्णतेची लाट जाणवली. आजवर २०२४ चा एप्रिल सर्वात उष्ण ठरला होता. मात्र २०२५ हे वर्ष कदाचित हा विक्रम मोडेल. कारण फेब्रुवारी ते एप्रिल असे सलग तीन महिने उष्णतेच्या लाटांचे कालावधी सर्वाधिक ठरले आहेत.

यंदा अतिउष्णतेमुळे पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होत आहे. त्यामुळे कडक ऊन आणि बाष्प यांच्या संगामातून हिट डिस्कंफर्टचा त्रास लोकांना होत असल्याचे मत हवामान शास्त्रज्ञांनी व्यक्त केले आहे. पूर्वी उन्हाळ्यात फक्त विदर्भ आणि कोकणात हा त्रास होत असे. आता मात्र पुणे, नाशिक, छ. संभाजीनगर, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर या शहरांतही असा त्रास होत आहे. प्रचंड उकाड्यामुळे कुलर, पंखे लावले तरी थंड न वाटता अस्वस्थ वाटते. अंगाची लाही लाही होते. येत्या काही दशकांत भारतातील ७० टक्केपेक्षा जास्त लोकांना अतिउष्णतेचा परिणाम जाणवू शकतो. एप्रिल ते जून हे सर्वात उष्ण महिने असतात. परंतु सप्टेंबरपर्यंतही विजेची मागणी जास्त राहते. होत एप्रिल याचे कारण म्हणजे 'वेट बल्ब इफेक्ट' अशी शास्त्रज्ञांनी संज्ञा तयार केली आहे. त्याला उष्ण आणि दमट असे वातावरण म्हणतात. त्यामुळे मानवी शरीर थंड होणे कठीण होते. तसेच शहरात काँक्रिटीकरणामुळे उष्मा बाहेर पडत नाही; तर ग्रामीण भागात काळी जमीन दिवसभर उष्मा शोषून घेते. त्यामुळे शहरांसह ग्रामीण भागही यंदा खूप जास्त तापला आहे.

# नागरवाडी आश्रमशाळेला आदिवासी विकास विभाग येथिल अपर आयुक्त जितेंद्र चौधरी यांची सदिच्छा भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ चांदुरबाजार**

कर्मयोगी श्री संत गाडगेबाबांचे अंतिम श्रध्दास्थान असलेल्या, श्रीक्षेत्र नागरवाडी येथिल श्री गाडगे महाराज प्रामथिम / माध्यमिक आश्रमशाळेला आदिवासी विकास विभाग अमरावती येथिल अपर आयुक्त जितेंद्र चौधरी यांनी आपली सदिच्छा भेट दिली.



या प्रसंगी संस्थेचे सर्वेसर्वा तथा नागरवाडी इंद्रभुवनाचे शिल्पकार बापूसाहेब देशमुख समवेत आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी अपर आयुक्त श्री.जितेंद्र चौधरी समवेत उपस्थितांचे हृदयस्पर्शी असे स्वागत केले.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते वैराग्यमूर्ती श्री संत गाडगेबाबा व भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतीमेचे पूजन व माल्यार्पण तसेच दिप प्रज्वलन करत नागरवाडी येथिल आयोजित प्राथमिक शिक्षकांच्या एक दिवसीय कार्यशाळेचा शुभ आरंभ करण्यात आला.विशेषत: मेळघाट क्षेत्रातील आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन ते बोलके व्हावे या सद्हेतून अपर आयुक्त जितेंद्र चौधरी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली या एक दिवसीय विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.प्रामुख्याने कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या संदेशाप्रमाणे सेवाव्रती बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नागरवाडी इंद्रभुवनाची सुरु असलेली वाटचाल व संस्थेचे सेवाभावी व शैक्षणिक उपक्रम खऱ्या अर्थाने कौतुकास्पद असल्याचे अपर आयुक्त श्री.जितेंद्र चौधरी व्यायपिठावरुन यावेळी बोलत होते. दरम्यान आश्रमशाळेतील मुलींना सुंदर नविन ड्रेसचे वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.प्रामुख्याने या कार्यक्रमाला प्रशिक्षक श्री.संदिप मुर्तडकर,श्री.श्याम मक्रमपुरे,प्रकल्प कार्यालय धारणी येथिल सहायक प्रकल्प अधिकारी श्री.जवाहर गाढवे,संचालक श्री. सागरभाऊ देशमुख,विस्तार अधिकारी श्री.रवी साखरकर, श्रीमती. कांचन रोंगरे, श्री.विजय खिराळे, श्री.मनिष होले आदिंसह छत्रपती संभाजी नगर,धारणी,अकोला येथिल प्रकल्प कार्यालय अंतर्गत येणाऱ्या शासकिय व अनुदानित आश्रमशाळेचे शिक्षक यावेळी उपस्थित होते. या कार्यशाळेच्या यशस्वीतेकरीता संस्थेचे सर्वेसर्वा बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# तुषार भारतीय धावले प्रांजळे कुटुंबियांच्या मदतीला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

अमरावती शहरातील रवी नगर मधील गजानन महाराज मंदिराजवळील प्रांजळे कुटुंब परिवारा सह काश्मीर ला गेले होते त्या ठिकाणी पहेलगाम येथे झालेल्या आतंकवादी हल्याने त्यांना प्रवास अर्धवट सोडून निघाले श्रीनगर येथेल सॉलिटियर या हॉटेल मध्ये अडकले होते. अमरावती कडे येण्याबाबत मार्ग मिळत नव्हता या वेळी त्यांचे अमरावती येथील मित्र निकेश उंबरकर आणि विवेक पांडे यांनी तुषार भारतीय यांना सर्व परिस्थिती सांगितली या वेळी तुषार भारतीय यांनी त्वरित प्रांजळे कुटुंबाशी संपर्क करून त्यांना धीर दिला तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क करून त्यांना सर्व माहिती पाठवली तत्काळ मुख्यमंत्री कार्यालयाने प्रांजळे कुटुंबाशी रात्री संपर्क करून ४ वाजताच्या विमानात त्यांची व्यवस्था केली या बाबतची सूचना त्यांना देऊन लवकरच अमरावती येथे सुखरूप पोहचतील केलेल्या सहकार्य बदल तुषार भारतीय यानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले.

### कश्मिरमधील ६४ प्रवासी सुरक्षित

पहलगाम येथील झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा आपत्ती कक्षातर्फे आतापर्यंत ६४ नागरिकांशी संपर्क करण्यात आला आहे. हे सर्व प्रवाशी सुरक्षित आहेत.जिल्हा आपत्ती कक्षातर्फे कालपर्यंत ४७ आणि आज १७ नागरिकांशी संपर्क साधण्यात आला आहे. याबाबतची माहिती मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, नियंत्रण कक्ष येथे पाठविण्यात आली आहे. सर्व प्रवाशी श्रीनगर येथे सुरक्षित असल्याची माहिती जिल्हा आपत्ती कक्षाने दिली आहे.

## पाकिस्तानींच्या ताटातील डाळी अन् कांदाही भारताचा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नवी दिल्ली**

भारतातून निर्यात करून आणलेल्या डाळी, मसाले आणि बासमती तांदूळ पाकिस्तानी लोक खातात. आता सध्याच्या तणावाच्या परिस्थितीत भारत या वस्तू पाकिस्तानला देणार का असा सवाल आहे. भारत पाकिस्तान विविध खाद्य वस्तू निर्यात करतो. यात विविध प्रकारचे मसाले, तांदूळ आणि फळांचा समावेश आहे. मिरची, हळद आणि जिरे या वस्तू पाकिस्तानला पाठवल्या जातात.

बासमती तांदूळ लोकप्रिय आहेत. भारत जगभरात बासमती तांदूळ मोठ्या प्रमाणात निर्यात करतो. बिर्याणी तयार करण्यासाठी या तांदळाचा वापर केला जातो. पाकिस्तानात बिर्याणी मोठ्या प्रमाणात तयार केली जाते. भारतीय चहा जगात प्रसिद्ध आहे. विशेष करून आसाम आणि दार्जिलिंग येथील चहा पाकिस्तानला मोठ्या प्रमाणात निर्यात केला जातो.

# अतिक्रमणांवर हातोडा! रस्त्यांचा श्वास मोकळा; महापालिकेची धडक मोहीम

## शहरातील अतिक्रमणे काढून घ्या, अन्यथा बुलडोजर; महानगरपालिकेने दिला अल्टिमेटम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

शहरात अतिक्रमणांची समस्या अतिशय गंभीर झाली आहे. रस्त्याच्या कडेला किंवा जागा दिसेल तिथे अतिक्रमणे केली जातात. काही तर पक्के शेड ठोकून अतिक्रमणे करतात. या अतिक्रमणांमुळेच शहरात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. आताही महानगरपालिका प्रशासनाने पुन्हा एकदा या अतिक्रमणांना रडारवर घेतलं आहे. शहरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू झाली आहे. पाहता पाहता अतिक्रमणे जमीनदोस्त होऊ लागली आहेत. काही जणांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेण्यास सुरुवात केली आहे.महानगरपालिकेच्यावतीने अतिक्रमण मोहिम सुरू असून आज दिनांक २४ एप्रिल,२०२५ रोजी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या उपस्थितीत जेसीपी व पाच ट्रक द्वारे रुक्मिणी नगर परिसर, सायंस्कोर परिसर, शिवटेकडी परिसर, बस स्टॅन्ड परिसरात महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी अतिक्रमण काढण्यास सुरुवात



केली. जोपर्यंत शहरातील रस्ते व फूटपाथ मोकळे होणार नाही तोपर्यंत ही अतिक्रमणाची कारवाई सुरू राहील. ज्यांनी अतिक्रमण केलं असेल त्या सर्वांनी अतिक्रमण स्वतःहून काढून घ्यावे अन्यथा महानगरपालिका प्रशासन काढून घेईल. तसेच कायदेशीर कारवाईलाही सामोरे जावे लागेल असा इशारा अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी दिल्या. या इशाऱ्याने अतिक्रमण धारकांचे धाबे दणाणले आहे.शहरातील मुख्य बाजारपेठ कापड बाजारातील अतिक्रमणांवर देखील लवकरच कारवाई करणार असून त्याबाबत शहरातील इतर भागातील अतिक्रमणे मोकळे करून मुख्य शहरातील अतिक्रमणांवर कारवाई करणार असे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी सांगितले.नागरिकांना या अतिक्रमणांचा त्रास सहन करावा लागत आहे. या गोष्टींचा विचार करुनच महानगरपालिका प्रशासनाने अतिक्रमणांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. महानगरपालिकेचे अतिक्रमण पथक कारवाई करून अतिक्रमणे काढून घेत आहे.सदर कारवाईत अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, श्याम चावरे, अतिक्रमण विभागातील कर्मचारी, पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

# निट परीक्षेपूर्वी अमरावतीत विद्यार्थ्यांसाठी मॉक टेस्ट परीक्षेच्या दडपणावर उपाय, 'वे एज्युकेशन इनिवेटिव्ह'चा स्तुत्य उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

येथील ब्रिजलाल बियाणी महाविद्यालयात आज NEET (नीट) परीक्षेच्या तयारीसाठी विशेष मॉक टेस्ट आयोजित करण्यात आली होती. शेकडो विद्यार्थ्यांनी या टेस्टमध्ये सहभाग घेतला. 'वे एज्युकेशन इनिवेटिव्ह' या संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह पालकांकडूनही भरघोस प्रतिसाद मिळाला.नीट परीक्षेला जे परीक्षेचे वातावरण असते तसेच सर्व वास्तवात उभं करण्याचा प्रयत्न या मॉक टेस्टद्वारे करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना नीट परीक्षेचा खराखुरा अनुभव देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा ठरला. परीक्षेचे वेळापत्रक, परीक्षा केंद्रावरचे वातावरण, तसेच बारीकसारीक नियम पाळत ही टेस्ट घेतली गेली. जसे NEET परीक्षेच्या दिवशी परीक्षा केंद्रावर असते, तसेच वास्तवदर्शी वातावरण तयार करण्यात आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना खरी परीक्षा देण्याचा अनुभव मिळाला आणि त्यांच्या तयारीत अधिक आत्मविश्वास निर्माण झाला.'वे एज्युकेशन इनिवेटिव्ह' च्या या उपक्रमाला पालक आणि विद्यार्थ्यांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला असून, पुढील मॉक टेस्ट येत्या २६ एप्रिल ला रोजी मनीबाई गुजराती हायस्कूल व २८ एप्रिल ला पी आर पोटे कॉलेजला होणार आहे. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या संधीचा लाभ घेण्यासाठी ८५३०४४६२२२ या नंबर वर संपर्क करण्याचे आयोजकांनी आवाहन केले आहे. 'वे एज्युकेशन इनिवेटिव्ह'चे संचालक रविकिरण पाटील यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांची नीट परीक्षेची भीती कमी करणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन देणे, हा आमचा उद्देश आहे. ही मॉक टेस्ट म्हणजे केवळ एक पेपर नव्हे, तर विद्यार्थ्यांना मनोबल वाढवणारा अनुभव आहे.प्राचार्य दीपक धोटे सर,प्रा. विनय बनसोड सर प्रा. नगमा खान मॅडम,संचालक रविकिरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही नीट ची यशस्वी मॉक टेस्ट घेण्यात आली. यावेळी परीक्षा पर्यवेक्षक म्हणून कु.विदिका मेहरे,मनोज पाठक ,रवींद्र मांडवेकर, गजानन मामीतकर ,शैलेश मगरदे यांनी काम पाहिले.

### नीट च्या विद्यार्थ्यांनी मॉक टेस्ट देणे अत्यंत आवश्यक

मला पेपर वेळेत पूर्ण करता आला का, मी कोणत्या प्रश्नांवर वेळ वाया घालते,परीक्षा केंद्रावरील कोणते वातावरण आपल्याला विचलित करू शकते हे मॉक टेस्ट च्या निमित्ताने लक्षात आलं. आता मी माझे परीक्षा संदर्भात धोरण वसुधारू शकेन आणि आणखी आत्मविश्वासाने परीक्षा देऊ शकेल.

**कु.अनुष्का (विद्यार्थिनी)**

### ही मॉक टेस्ट खूपच उपयुक्त ठरली

जेव्हा आपण घरात किंवा क्लासमध्ये पेपर सोडवतो, तेव्हा तितकं गंभीर वातावरण नसतं. पण आज इथे बसल्यावर खरी परीक्षा देतोय असंच वाटलं. परीक्षा केंद्रावर काय अडचणी येऊ शकतात आणि आपण त्यासाठी कस सक्षम असले पाहिजे हे सुद्धा आजच्या मॉक टेस्ट च्या निमित्ताने समजून घेता आलं.माझ्यासाठी ही मॉक टेस्ट खूपच उपयुक्त ठरली.

**ध्रुव (परीक्षार्थी)**

# राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटवले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील पांढरी खानमपूर येथील राष्ट्रीय महामार्ग ५४५ सी वर अतिक्रमण करून प्रतिष्ठाने उभारलेल्यांविरोधात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाद्वारे अतिक्रमण हटवण्याची मोहीम राबवण्यात आली. मागील वर्षी प्रवेशद्वाराच्या वादावरून चर्चेत असलेले तालुक्यातील पांढरी खानमपूर हे गाव राष्ट्रीय महामार्गावर असून, राष्ट्रीय महामार्गावर बऱ्याच नागरिकांनी अतिक्रमण केले होते. महामार्गावर अतिक्रमित प्रतिष्ठानमुळे अडचणी निर्माण झाल्या होत्या. याबाबत शासकीय पोर्टलवर मोठ्या प्रमाणात तक्रारी दाखल होत होत्या. या तक्रारींची दखल घेत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून अतिक्रमणधारकांना अतिक्रमण काढण्याबाबत नोटीस बजावण्यात आल्या होत्या. मंगळवारी अतिक्रमित जागा मोकळी करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व पोलिस विभागामार्फत अधिक्रमण हटाव मोहीम राबवण्यात आली. पांढरी गावात असलेल्या राष्ट्रीय महामार्गावर सर्व अतिक्रमित प्रतिष्ठाने हटवून राष्ट्रीय महामार्ग मोकळा करण्यात आला. या वेळी राष्ट्रीय महामार्गाचे अकोला उपविभागीय अभियंता प्रज्ञाकर वानखडे, स्थापत्य अभियंता मंगेश पंडित, अंजनगाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार आयपीएस अधिकारी प्रशांत दगडे, सहायक पोलिस इन्स्पेक्टर सागर भास्कर तसेच आरपीएफ फोर्स अंजनगाव पोलिस स्टेशन पोलिस कर्मचारी यांनी अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबवली.

# पहलगाम घटनेचा दर्यापूरात शिवसेनेच्या वतीने जाहीर निषेध : मृत व्यक्तींना वाहिली श्रद्धांजली




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५दर्यापूर**

जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे दहशतवादी यांनी केलेल्या हल्ल्यात अनेक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला असून या घटनेने संपूर्ण देश ढवळून निघाला आहे.या घटनेचा दर्यापूरात शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्या नेतृत्वात जाहीर निषेध करण्यात आला. याबाबत लवकरात लवकर कारवाई करून मृत व्यक्तींना न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली.यावेळी मृत व्यक्तींना श्रद्धांजली वाहण्यात आली.रवींद्र गणोरकर, राजेंद्र गायगोले रवी पवार , तुषार चौधरी, अतुल सगणे मनोज गव्हाणे, छाया निचळ गणेश गावन्डे, अशोक रेखे सचिन कोरडे,नागेश काबे, अशोक रेखे, गणेश धुराटे ,विनय गावंडे नीरज नागे,सौरभ वायझाडे, महेश वादे, सागर गेठे ,राम गावन्डे हेमंत उमाळे, अभिजीत प्राजळे, गौरव सगणे, राहुल भुबर,निशांत वानखडे विठ्ठलअरबट गोकुळ चांदुर कर विनोद गेठे अक्षय आठवले विनय गावन्डे, शिवा राऊत, पवन राऊत,शरद अरबट आदी उपस्थित होते.

# अमरावती बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद

## व्यापारी बांधवांनी प्रतिष्ठाने स्वयंस्फूर्तीने ठेवले बंद : राजकमल चौकात सामूहिक भावपुर्ण श्रद्धांजली







**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

जम्मू काश्मीर येथील पहेलगाम येथे झालेल्या आतंकवादी हल्ल्याच्या निषेधार्थ आज अमरावती मध्ये हिंदुत्ववादी संघटनांनी केले बंदचे आवाहन केले होते त्या आवाहनाला अमरावतीकर नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद देत आपले दुकाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवले व बंद मध्ये सहभागी झाले.

आज सकाळी पासून अमरावती शहरातीलसर्व प्रमुख बाजारपेठा या तीन वाजेपर्यंत बंद ठेवण्यात आल्या होत्या.विश्व हिदू परिषद,व बजरंग दलाने व इतर संघटनांनी आज अमरावती बंद ची हाक दिली होती ११ वाजता पहेलगाम येथे आतंकवादी हल्ल्यात ठार गेलेल्या सर्व नागरिकांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली व त्यानंतर मान्यवरानी आपले मनोगत व्यक्त करीत हल्ल्यात ठार झालेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली.त्यानंतर हनुमान चालीसाचे पठण करण्यात आले व त्यानंतर सर्व बजरंग दल,विश्व हिंदू परिषद चे कार्यकर्ते,व्यापारी व सामान्य नागरिक हे दुचाकी ने जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहचलेजिल्हाधिकारी सौरभ कटीयर यांना निवेदन देत घटनेचा निषेध व्यक्त केला.या कार्यक्रमाच्या वेळी कुठलेही अप्रिय घटना होऊ नये या साठी संपूर्ण शहरात आज पोलिसांनी तगडा बंदोबस्त लावण्यात आला असल्याची माहिती पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांनी दिली.या वेळी राजकमल चौक भारत माता की जयपाकिस्थान मुर्दाबाद या घोषणेने दुमदुमून गेला होता मात्र पहेलगाम येथे झालेल्या या भ्याड हल्याबद्दल प्रत्येकाच्या मनात चीड दिसून येत होती.गोविंदजी शेंडे विश्व हिंदू परिषद क्षेत्र मंत्री,बंटी पारवाणी विश्व हिंदू परिषद विभाग मंत्रीप.पु. संत श्री. डॉ. संतोषदेवजी महाराज,श्री.रामप्रिया श्रीजी (माई).प.पू. संत श्री. सचिनदेवजी महाराज,प. पु.संत श्री. सुंदरदास प्रभुजी महाराज (इस्कॉन)डॉ. सुरेश चिकटे, राजीव देशमुख, सिधुजी सोलंकी, त्रिदेवजी डेंडवाल, विजय खडसे, दिपक पाठक, ज्ञानेश्वर महाराज पातसे, अनिल शर्मा बादल कुलकर्णी, अनिल साहू, सुधीर बोपुलकर, कवलजीत पांडे, निषाध जोध, प्रदीप सोलंकी, मुन्ना मालवीय, निलेश टवलारे, सतीश शेंद्रे प्रकाशज लुंगीकर, गुरुदयाल सिंह बावरी, दुर्गेश ठाकूर, शंतनू भंडारजकर, निखिल विश्वकर्मा, यश गुप्ता, सतीश कुरील, कैलास परदेशी, अश्विन चौधरी, अक्षय निनावे, करण सोलंकी, सूरज प्रधान, भूषण दलाल, सागर व्यास, कार्तिक नाचणकर, श्रेयस बाडाबुचे, पंकज गायकवाड, कर्ण धोटे , गौरव काकडे, दिपक यलगलवार, गणेश गोंड, अभिनव विरुलकर, निखिल चव्हाण, तुषार चौधरी, अजिंक्य कांळे, युबराज काकड, पवन भिंडा, मंगेश सोलंके, नितीन सोळंके, सागर पवार, राहुल वाघारे, अमर सरोदे, कमल चावरे, अभिजीत नाईक, अनिकेत ठाकूर, ललित ठाकूर, कृष्णा पवार पवन श्रीवास,सौ. शुभदाताई पोद्दार, अड. सौ. नमितातार्इ तिवारी, सौ. अर्चनाताई देवडिया, लीनाताई शर्मा, गायत्री निलगिरे, मुक्ता वानखडे, पूजाताई जोशी, प्रियाताई इंगोले, रुपाली सपाटे, ऋषिका पिंगळे, वैष्णवी सोनोने, शुधुमती आसरे,तसेच विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, हिंदू हुंकार संघटना, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, हिंदू क्रांती संघटना, हिंदू जनजागृती, राष्ट्रीय बजरंग दल, श्री राम सेना, हिंदू सूर्य प्रतिष्ठान, करणी सेना, हिंदू युवा वहिनी, हिंदू महासभा, हिंदू क्रांती संघटना, मातृशक्ती, दुर्गावहिनी, सनातन संस्था, तसेच सर्व हिंदुत्व वादी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भीती आणि चिंता; नागपुरात तब्बल २२०० वर पाकिस्तानी नागरिक




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ नागपूर**

उपराजधानीत जवळपास दोन हजार दोनशेपेक्षा जास्त पाकिस्तानी नागरिक व्यवसायाच्या निमित्ताने राहतात. त्यात सर्वधर्मीयांचा समावेश आहे. भारत सरकारकडून त्यांनी रितसर ‘व्हिसा’ घेतलेला आहे. त्यामुळे त्यांचे वास्तव्य कायदेशीर ठरते.

पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याच्या घटनेनंतर केंद्र सरकारने भारतात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत भारत सोडावा, असे निर्देश दिले आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचे पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे. तसेच याबाबत गुप्तचर विभाग सतर्क झाला आहे.पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नागपुरात जवळपास २ हजार २०० पेक्षा अधिक पाकिस्तानी नागरिक व्यवसायानिमित्त किंवा अन्य कारणास्तव नागपुरात राहतात. उत्तर नागपूर आणि जवळपासच्या परिसरात ‘व्हिसा’वर आलेल्या या नागरिकांची संख्या मोठी आहे.सुरक्षाविषयक केंद्रीय समितीच्या (सीसीएस) बैठकीनंतर नागपुरात सुरक्षा दलाकडून शोध मोहीम राबवण्यात आली आहे. मात्र, यासंदर्भात पोलीस प्रशासनाला अधिकृत निर्देश अद्यापही प्राप्त झाले नाहीत. खबरदारी म्हणून पोलीस प्रशासन ही मोहीम राबवत आहे.नागपुरात वास्तव्यास असलेल्या पाकिस्तानी नागरिकांची पोलीस विभागाकडे अधिकृत माहिती असली तरी ‘व्हिसा’ संपल्यानंतरही ते नागपुरात वास्तव्यास आहेत काय? कोणता व्यवसाय करतात? अशी माहिती नव्याने घेतली जात आहे.

### पोलीस प्रशासनाकडून शोध मोहीम

सरकारच्या आदेशानुसार कारवाई करणार आहोत. खबरदारी म्हणून पोलीस प्रशासन सतर्क असून शोध मोहीम राबवली जात आहे.

**– डॉ. रवींद्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त**

# पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा अचलपूर-परतवाडा येथे तीव्र निषेध

## मुस्लिम समाजाकडून उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर;दहशतवाद्यांना कठोर शिक्षा देण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अचलपूर**



जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा अचलपूर आणि परतवाडा येथील मुस्लिम समाजाने तीव्र निषेध केला आहे. या घटनेविरोधात उपविभागीय अधिकारी कार्यालय, अचलपूर येथे निवेदन देण्यात आले.

या निवेदनात नमूद करण्यात आले की, काही दहशतवाद्यांनी निहत्थ्या पर्यटकांवर हल्ला करून देशाच्या एकता व शांततेला आव्हान दिले आहे. हा एक अमानवी आणि निष्काळजी कृत्य असून, याचा समाजाकडून तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला आहे. केंद्र सरकारने या दोषींना तत्काळ अटक करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे, जेणेकरून भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाहीत.तसेच, या घटनेदरम्यान काही प्रसारमाध्यमांनी या घटनेची चुकीची मांडणी करून समाजात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला, असा आरोपही करण्यात आला. मात्र, सोशल मीडियावर सक्रिय असलेल्या जागरूक नागरिकांनी सत्य माहिती समोर आणून समाजात शांतता राखण्यात मोलाची भूमिका बजावली.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, आज समाजामध्ये मानसिक असंतुलन वाढत चालले आहे. यामागे राजकीय स्वार्थ आणि सामाजिक तणाव कारणीभूत आहेत. त्यामुळे शासनाने मानसिक आरोग्यासाठी विशेष धोरण तयार करावे आणि समाजाला सकारात्मक दिशा द्यावी. प्रसारमाध्यमांनाही देशहित लक्षात घेऊन जबाबदारीने आणि तथ्यपूर्ण बातम्या सादर करण्याचे आवाहन करण्यात आले, जेणेकरून समाजात सौहार्द आणि ऐक्य टिकून राहील.या निवेदनावर काझी सय्यद गयासुद्दीन साहेब, मोहम्मद मकसूद रजा साहेब, कबीर हनफी साहेब, मोहम्मद मुजाहिद साहेब, हाजी इरफान साहेब, डॉ. एम. अनीस, नदीम खान, मोहम्मद साजिद, असलमभाई नदीम उर रहमान, एजाज खान, अबुल हसन सर यांच्यासह अनेक मान्यवरांची स्वाक्षरी होती आणि त्यावेळी ते उपस्थित होते.

# लोकप्रिय आमदार रवी राणांचा वाढदिवस होणार साधेपणाने साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

वर्षभर २४/७ जनतेसोबतत्यांच्या सुख-दुःखात सहभागी असलेले बडनेरा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार रवी राणा यांचा वाढदिवस २८ एप्रिल रोजी आहे. परंतु जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २७ लोकांच्या मृत्यू मुळे संपूर्ण देशात प्रचंड संतापाची लाट उसळली आहे. पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या २७ निष्पाप प्रवाशांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आमदार रवी राणा यांच्या वाढदिवसानिमित्त २८ एप्रिल रोजी मोर्शी रोडवरील श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. ज्यामध्ये पहलगाममध्ये मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी हजारो लोकांना सहभागी होऊन श्रद्धांजली वाहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच आमदार रवी राणा हे वाढदिवसाच्या शुभेच्छा देणाऱ्यांकडून पुष्पगुच्छ किंवा हार, बुके स्वीकारणार नाहीत. म्हणून पुष्प गुच्छ किंवा पुष्प हार,केक,बुके आणू नये. तसेच कोणत्याही कार्यकर्त्यांनी केक कापू नये. फटाके फोडू नये. अशी विनंती युवा स्वाभिमान पक्षातर्फे करण्यात आली आहे.



वाढदिवस असला तरी पहलगामच्या शहीदांना श्रद्धांजली म्हणूनच हे रक्तदान शिबीर होणार आहे. गोर गरीबांच्या सेवे आणि मदतीसाठी विविध सामाजिक उपक्रम देखील आमदार रवी भाऊ राणा यांनी आयोजित केले आहे.महाआरोग्य आणि भव्य रक्तदान शिबिरगोर गरीब आणि गरजू लोकांसाठी नेहमी तत्पर आमदार रवी राणा यांच्या पुढाकाराने दरवर्षी प्रमाणे वाढदिवसानिमित्त, राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षातर्फे २८ एप्रिल रोजी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात महाआरोग्य आणि रक्तदान शिबिर आयोजित केले आहे.यामहाआरोग्य शिबिरात नाक, कान, घसा, कर्करोग, मॅमोग्राफी, सामान्य शस्त्रक्रिया, बालरोग, श्वसन रोग, मूत्रपिंड, त्वचारोग, यकृत, दंत रोग, स्त्रीरोग, हाडांचे आजार, सांधे बदलणे, हृदयरोग यासह संपूर्ण आरोग्य तपासणी मोफत केली जाईल. याशिवाय, वैद्यकीय उपचार देखील मोफत असतील. ईसीजी, डोळ्यांची तपासणी, शस्त्रक्रिया आणि चष्मे सुद्धा मोफत वाटले जातील. सामाजिक उपक्रमांमध्ये स्वयंरोजगारासाठी बेरोजगारांना चारचाकी लोट गाडी वाटल्या जातील. विधवा आणि परित्यक्त महिलांना शिलाई मशीन वाटप केले जाईल. मुलांना बॅट बॉल किट वाटले जातील. भजन महिला मंडळाला भजन साहित्य वाटप करणार. तसेच, विविध क्षेत्रांचे पीआर कार्ड वितरित केले जातील. रक्तदान करणाऱ्यांना १६ जीबी पेन ड्राइव्ह किंवा ब्लूटूथ, सन्मान चिन्ह आणि प्रशस्तिपत्र दिले जाईल. युवा स्वाभिमान पक्षाने मतदारसंघातील सर्व जनतेला मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# अमरावती विमानतळाच्या नामकरणाचा मुद्दा पुन्हा चर्चेत

## श्री संत गुलाबराव महाराज संस्थानने तातडीची सभा घेऊन ठराव केला मंजूर
## संत गुलाबराव महाराजांच्या मूळ गावातून मागणी; मुख्यमंत्र्यांसह नेत्यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ माधान**

अमरावती विमानतळाच्या नामकरणाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज यांच्या मूळ गाव माधान (ता. चांदूर बाजार) येथील संस्थानने विमानतळाला त्यांचे नाव देण्याची मागणी केली आहे.श्री संत गुलाबराव महाराज संस्थानने तातडीची सभा घेऊन याबाबत ठराव मंजूर केला. संस्थानचे विश्वस्त रमेश मोहोड यांनी मांडलेल्या प्रस्तावाला साहेबराव मोहोड यांनी अनुमोदन दिले. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विमानतळ विकास प्राधिकरणच्या उपाध्यक्ष स्वाती पांडेय, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, खासदार बळवंतराव वानखडे आणि आमदार प्रवीण तायडे यांना पाठवण्यात आल्या आहेत.




संत गुलाबराव महाराज यांना १९०१ मध्ये माऊलींनी स्व-नामाचा मंत्र दिला. त्यांनी योगशास्त्र, संगीतशास्त्र, काव्यशास्त्र, आयुर्वेद आणि नीतिशास्त्राचा अभ्यास केला. पाश्चात्य तत्वज्ञानावरही त्यांनी खंडन-मंडन केले. त्यांनी स्वतःचा माऊली संप्रदाय स्थापन केला आणि नवीन नावंगलीपी तयार केली.

महत्त्वाची बाब म्हणजे संत गुलाबराव महाराज केवळ ३४ वर्षे जगले. या अल्प आयुष्यात त्यांनी १३४ ग्रंथांची निर्मिती केली. त्यांचा जन्म बेलोरा विमानतळापासून ५ किलोमीटर अंतरावरील लोणी टाकळी येथे झाला. नवव्या महिन्यात त्यांची दृष्टी गेली. त्यानंतर ते माधान येथे वास्तव्यास होते.

दरम्यान, विमानतळाला भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्याची मागणीही समोर आली आहे. त्यांच्या नावे राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची शिक्षण संस्था आणि अकोला येथे कृषी विद्यापीठ आहे. विश्वस्त मंडळाने त्यांना भारतरत्न देण्याची मागणीही केली आहे.

# महाराष्ट्रात पहिल्यांदाच आढळला पांढरा बिबट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५नागपूर**

‘ब्लॅक लेपर्ड’ म्हणजेच काळ्या बिबट्यांची संख्या अलीकडच्या काही वर्षात वाढली आहे. पांढऱ्या बिबट्याची नोंद मात्र अजूनतरी राज्यात झालेली नव्हती. बुधवारी कोकणातील रत्नागिरी येथे बिबट्याचा पांढरा बछडा आढळून आल्याने सगळीकडेच चर्चा झाली. या बछड्याने अद्याप डोळेही उघडलेले नव्हते, पण मादी बिबट त्यांना घेऊन गेली.महाराष्ट्रातील कोकणात पहिल्यांदाच या बिबट्याचा पांढऱ्या रंगाचा बछडा आढळला आहे. कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील एका गावात काजू लागवडीसाठी झाडे तोडण्याचे काम सुरू होते. झाडे तोडत असताना मजूरांना बिबट्याचे दोन बछडे आढळून आले. त्यातील एक बछडा सामान्य होता, तर दूसरा बछडा मात्र पूर्णपणे पांढऱ्या रंगाचा होता. हे दोन्ही बछडे नुकतेच जन्मलेले असावेत कारण त्यांनी डोळे देखील उघडलेले नव्हते.

ऊस तोडणी कामगारांना ते आश्चर्य वाटल्याने त्यांनी या बछड्याची छायाचित्र घेण्यास सुरुवात केली. मात्र, जवळच असलेल्या मादी बिबट्याने त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला आणि ते कामगार तेथून दूर



पळाले. रत्नागिरी वनखात्याला ही माहिती मिळाली. वनखात्याची चमू दाखल होईस्तोवर मादी बिबट्याने तिच्या दोन्ही बछड्यांसह मुक्काम हलवला होता.दरम्यान,या परिसरात कॅमेरा ट्रॅप लावण्यात आले असून बिबट्याच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यात येत आहे. बिहार आणि मध्यप्रदेश या राज्यात यापूर्वी १९६ आणि १९६५ साली पांढऱ्या रंगाचे बिबट आढळल्याची नोंद आहे. महाराष्ट्रात मात्र पहिल्यांदाच पांढऱ्या रंगाचा बिबट आढळला आहे. महाराष्ट्रातील ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्प, पेंच व्याघ्रप्रकल्प, नवेगाव-नागझिरा व्याघ्रप्रकल्पात काळ्या बिबट्याच्या नोंदी आहेत.